# माणूस

शनिवार । ९ ऑगस्ट १९८० 
एक रुपया




**मौत कितनी भी**
**शानदार सही**
**ज़िन्दगीका मग़र**
**जवाब नही ।**

पृष्ठ...५, ६, २१, २२

**नवीन लेखमाला**

पृष्ठ...१२

## सप्रेम नमस्कार..

संपादक 'माणूस' यास

◻ आपला 'बुद्धिवाद आणि मृत्यू' हा लेख वाचला. अतिशय तर्कशुद्ध आणि कोणालाही पटण्यासारखे विचार मांडल्याबद्दल अभिनंदन. फक्त काही मुद्द्यांबद्दल खुलासा.

१. रोग्याचे प्राण अखेरपर्यंत वाचवण्याची डॉक्टर धडपड का करतात ? या ठिकाणी डॉक्टर व रोगी ही एक professional & client अशी relationship असते. वकील जसा आपले अशील दोषी आहे हे सिद्ध होण्यासारखे असतानाही त्याची बाजू शेवटपर्यंत लढवतो तसे हे आहे. 'माझ्यावर उपचार करा' म्हणून रोगी डॉक्टरकडे आल्यावर 'आता हा किती दिवस जगणार आहे ? याचा समाजाला उपयोग किती ? याच्यावर होणाऱ्या खर्चात इतर गरीब रुग्ण पुन्हा उपयोगी होतील'; हे विचार डॉक्टरने करायचे नसतात. हा संपूर्ण समाजाने करायचा विचार आहे. त्याचा घटक म्हणून अनेक डॉक्टर स्वेच्छा मृत्यूचे तत्त्व मान्य करतात. ते कायदेशीर ठरल्यास गर्भपाताप्रमाणेच सर्वत्र त्याचा वापर होईलही.

२. भविष्य आणि मद्यपान : बुद्धिवाद्यांचा आक्षेप अंधश्रद्धाविरुद्ध असतो. मद्यपान ही काही अंधश्रद्धा नव्हे. समाजघातक ठरणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा आम्ही बीमोड करू असा काही बुद्धिवाद्यांचा दावा नसतो.

३. जातिभेद आणि धर्म : 'जातिभेद हे धर्माचे अंग नाहीच, पुरोहितशाही, बुवाबाजी वेगळी आणि खरा धर्म वेगळा' हे फक्त तत्वविचार (Theory) झाले. प्रत्यक्षात काय आढळते ? विचार आणि आचार यात फरक बुद्धिवाद्याचेमध्ये आढळतो त्याच्या शंभरपट धर्मवाद्याचेमध्ये आढळतो. त्यामुळेच अत्युच्च विचार कागदोपत्री असणारा हिंदुधर्म अत्यंत नीच वर्तणूक पदोपदी आपल्याच धर्मबांधवाना देताना आढळतो. पुरोहितशाही आणि जातिभेद हे हिंदुधर्माचे बुरूज आहेत. त्यावर हल्ला करा पण किल्ल्यावर करू नका असे कसे करता येईल ?

४. पंढरपूरची पूजा : एखाद्या ठराविक दिवशी ठराविक ठिकाणच्या देवाचे दर्शन घेतल्याने पापनाश होतो ही कल्पना अगदी चुकीची आहे. ती नाहीशी करायचे प्रयत्न सोडून मंत्रीच जर थाटामाटाने त्यात भाग घेऊ लागले तर त्याला विरोध केलाच पाहिजे.

५. लक्ष्मणशास्त्रींनी केलेली सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा : याचा खुलासा त्यांनी पत्रकार परिषदेत केला होता. 'या देवालयातील मूर्तीची पूजा करण्याचा अधिकार अस्पृश्यांना नाही राहील.' असे कलम या देवळाच्या ट्रस्ट डीडमध्ये होते. त्यामुळे त्या वेळचे शंकराचार्य आणि पूजाशास्त्राधिकारी यांनी ही प्राणप्रतिष्ठा करण्यास नकार दिला. हे कलम ठेवणार असाल तरच मी पौरोहित्य करेन या अटीवर नास्तिक असणाऱ्या शास्त्रीजींनी ते केले. समाजातील एका मोठ्या घटकावरील अन्याय चालूच ठेवण्याचा हिंदुधर्ममार्तंड आग्रह धरत होते. त्या वेळी आपल्या वैयक्तिक मताला मुरड घालून तो मोडून काढण्यास शास्त्रीजी पुढे सरसावले याबद्दल त्याचं अभिनंदन आणि धर्मशास्त्र्याचा निषेध करायला हवा ते सोडून लोक शास्त्रीजींनाच दोष देतात, याला काय म्हणावे ?

२ ऑगस्ट डॉ. शरद अभ्यंकर, वाई

◻ सतीश कामतांचा 'संजयनंतरची दिल्ली' हा एकटाकी अंक वाचला. ( १९ जुलै ) काल अंक आल्याबरोबर वाचायला सुरुवात केली व संपवूनच अंक खाली ठेवला. कामतांचा यापूर्वीच्या अंकातील दिल्लीतील (संजयनंतरच्या) फेरफटक्याचा लेख वाचला होताच. कामताचे लिखाण इतके निरीक्षणपूर्ण आहे की, आपण समक्षच दिल्लीतून फिरत आहोत असे वाचताना वाटते. दिल्लीत प्रतिष्ठिताच्या घेतलेल्या मुलाखतीचे वृत्तात अगदी मार्मिक व वेचक शब्दात दिले आहेत. आशयात कोणतेही न्यून न आणता थोडक्यात सर्व तपशील देण्याची त्याची हातोटी कौतुकास्पद आहे.

इतके सुरेख बातमीपत्र लिहिल्याबद्दल सतीश कामतांचे मन पूर्वक अभिनंदन !

१९ जुलै जयवंत घायगुडे
मु. पो. भादे (जि. सातारा)

('कै. र. वा. दिघे–एका समृद्ध वाङ्मय-प्रकाराची गंगोत्री' हा लेख गेल्या २ ऑगस्ट माणूस अंकात प्रसिद्ध झालेला आहे. हा लेख चंद्रशेखर राजे, डोंबिवली, यांनी लिहिलेला आहे. लेखकाचे नाव लेखासोबत द्यायचे नजरचुकीने राहून गेले.–सं.)


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : दहावा
९ ऑगस्ट १९८०
किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

पुणे वार्ता

# बुद्धिप्रामाण्य आणि शब्दप्रामाण्य

**२६ जुलै.** पुण्यामध्ये एक 'अभिनव' मेळाव्याचे आयोजन केले होते–'बुद्धिप्रामाण्यवादी मेळावा.' निमंत्रक होते वाईचे डॉ. शरद अभ्यंकर. वक्त्यामध्ये प्रा. स. शि. भावे, आमदार ग. प्र. प्रधान, डॉ. अनिल अवचट असे नामांकित होते व अध्यक्षपद तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी भूषविणार होते. त्यामुळे साहजिकच तेथे उपस्थित असलेला श्रोतृवर्ग हा 'हे आहे तरी काय बुवा?' अशा उत्सुकतेनेच जमलेला होता.

या मेळाव्याच्या निमित्ताने काढलेल्या पत्रकात दोन तीन–प्रश्न विचारलेले होते. (तुम्ही बुद्धिप्रामाण्यवादी आहात काय? वगैरे.) आत्मा, पुनर्जन्म, जन्माधिष्ठित जातिश्रेष्ठत्व, नवस, भानामती, बुवा व त्याचे चमत्कार इ. गोष्टींचा भारतीय जनमानसावर जबरदस्त पगडा असल्याने तो मागास राहिलेला आहे, जातिभेदाने गुरफटलेला व अंधश्रद्ध बनला आहे आणि हे सर्व नष्ट करून, विज्ञाननिष्ठा व मानवतावाद मानणारा समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार ग. प्र. प्रधान या पहिल्याच वक्त्याने दहा मिनिटांचे बंधन पाळून आपले विचार सुस्पष्टपणे मांडले. टिळक व आगरकर यांच्या विचाराचा आणि जुन्या काळातही बुवाबाजीविरुद्ध आघाडी उघडणाऱ्या किर्लोस्कर मासिकाचा त्यांच्या तरुण वयात पडलेल्या प्रभावाचे वर्णन करून ते म्हणाले की, 'देशाच्या प्रगतीत सर्वसामान्य माणूस हा महत्त्वाचा असतो आणि तोच जर अंधश्रद्धेत गुरफटला तर विकास थाबेल. सर्वांना समजणारा व सामाजिक दु:खाचे निराकरण करण्यासाठी बुद्धीचाच निकष लावणे जरुरीचे आहे' असे त्यानी आग्रहाने प्रतिपादन केले. पाश्चात्य देशात, विशेषत: अमेरिकेत आलेल्या अध्यात्माच्या लाटेचा उल्लेख करून ते म्हणाले की, 'सायन्सच्या व समृद्धीच्या अतिरेकाचा तो परिणाम आहे; मात्र आपल्या देशाला विज्ञाननिष्ठेची व विज्ञानाच्याच प्रगतीची गरज आहे.'

डॉ. अरुण लिमये यांनी अंधश्रद्धा दूर करण्यासाठी भांडणाऱ्या कार्यकर्त्यांची एक महाराष्ट्रव्यापी संघटनेच्या निर्मितीची गरज असल्याचे सांगितले.

'बालपणापासून स्पून फीडिंग पद्धतीच्या शिक्षणाची सवय व्यक्तीच्या मनाला लागलेली असल्याने नुसत्या शिक्षणाच्या प्रसाराने अंधश्रद्धा दूर होणार नाही बुद्धीचा वापर करणे हा बुद्धिप्रामाण्यवाद; पण त्याने सर्व प्रश्नावर अंतिम उत्तर मिळेलच असे गृहीत धरू नये,' असे सांगून किर्लोस्कर मासिकाचे संपादक मुकुंदराव किर्लोस्कर यानी 'गेली ३३ वर्षे लोकांनी स्वतंत्र विचार करू नये असे प्रयत्न राजकारण्यानी त्यांच्या स्वार्थासाठी केले' अशा शब्दात राजकीय पुढाऱ्यावर प्रहार केला.

डॉ अनिल अवचट यांच्याकडे बुवाबाजी व चमत्कार हा विषय होता. 'जीवनात अस्थिरता असणाऱ्या व्यक्तीला व समाजाला 'आधार' म्हणून देव लागतो व लोकांना देवाकडे नेणारी माध्यमे 'बुवा' बनतात. लोकांची गरज ओळखूनच बुवाचा जन्म होतो.' अशा तऱ्हेने बुवांच्या उगमाचे वर्णन करून प्रत्येक वर्गाच्या बुवाचे त्यानी वर्णन केले. तळच्या वर्गात 'अंगात येणारा' मांत्रिक असतो तर मध्यमवर्गात 'कुंडलिनी' जागृत करणाऱ्या महाराजाचे प्रस्थ असते (येथे त्यांनी गुळवणीमहाराजावर टीका केली) तर उच्च वर्गीयाना व 'इंटलेक्चुअल्सना' रजनीश किंवा जे कृष्णमूर्तींची गरज भासते. स्वत:चे भवितव्य पूर्णपणे दुसऱ्याच्या हाती सोपवणे, ही हतबलता एका वेगळ्या प्रकारच्या 'फॅसिझम्'ची नांदी ठरू शकेल अशी भीती त्यानी व्यक्त केली. समाजजीवन स्थिर असणे व परिसंवाद, मेळावे, लेख या सर्व साधनासह बुवांवर हल्ला चढवण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

'दगडी भिंतीवर टकरा घेतल्याने पाऊसपाणी व्यवस्थित होईल अशी समजूत असणाऱ्या लोकाना समजावून सांगण्यात शहरी बुद्धिप्रामाण्यवाद कुचकामी ठरतो' असे सांगून ग्रामीण भागात अंधश्रद्धेची मुळे किती खोलवर रुजली आहेत ते डॉ. नरेंद्र दाभोळकर यानी स्पष्ट केले. 'एकदा जर बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारला तर मग तो शेवटपर्यंत कसोशीने पाळणे आवश्यक आहे. विचारधर्म व आचारधर्म यात फरक असता कामा नये,' हा मुद्दा त्यानी आग्रहाने प्रतिपादन केला.

रावसाहेब कसबे याच्या मते आर्थिक दारिद्र्यातूनही अनेक वाईट रूढी उगम पावल्या. उदाहरणार्थ ग्रहणाच्या वेळी दान मागणे. समाजातील आर्थिक विषमता नष्ट होणे हे जरुरीचे आहे, असेही त्यानी सांगितले. तसेच चागल्या विचाराना पाठिंबा मिळण्याच्या दृष्टीने लोकापर्यंत ते विचार पोचविण्याकरता व विचारात सुस्पष्टता येण्याकरिता परिसंवाद व मेळावे आवश्यक आहेत असेही त्यानी स्पष्ट केले.

### उत्क्रांतीचा संदर्भ

प्रा. रा. शि. भावे याचे भाषण अत्यंत मुद्देसूद झाले. (फर्ग्युसनमधील लेक्चर–हॉल आठवणे अपरिहार्य होते.) मानवाच्या उत्क्रांतीचा थोडक्यात आढावा घेताना मानवाचा मेंदू हा विकसित झाला नसून गरजेनुसार तो वाढला आहे, असे त्यांनी मानसशास्त्राचा हवाला देऊन सांगितले. जोपर्यंत माणसाच्या मनात विविध भावना आहेत, मृत्यूची भीती आहे तोपर्यंत १००% बुद्धिप्रामाण्यवाद येणे अशक्य हा त्याचा मुद्दा महत्त्वाचा होता. भावनाशील व देव वगैरेवर विश्वास असणाऱ्यांशी बोलताना बुद्धिप्रामाण्यवाद्यानी आग्रहाची, आक्रमक भूमिका न घेता सहानुभूतीची व समजुतीची घ्यावी अशी आग्रहाची सूचनाही त्यानी केली.

नंतर पुण्यातील एक वृद्ध नागरिक श्री गणेशशास्त्री शेंड्ये याचे पाचच मिनिटे पण मनोरंजक भाषण झाले. त्यानी अगोदरच्या वक्त्यांचा खुमासदार रीतीने 'समाचार' घेतला, रावसाहेब कसबे

यांच्या भाषणातील डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीचा उल्लेख करून ते म्हणाले, 'कुणी आंबेडकराचे ऐकतो तर मग आम्ही वसिष्ठ-ऋषीचे ऐकले तर बिघडले कुठे ? कारण दोघेही कुणाचे तरी अनु-यायीच. एवंच शब्दप्रामाण्यवादच खरा ! बुद्धिप्रामाण्यवाद्यासमोर ते उपस्थित करत असलेल्या एकेका प्रश्नाला पडत असलेल्या टाळ्या बघून एकंदर मेळाव्याच्या यशस्वितेबद्दल शंका मनात आली तर नवल ते काय ?

सरतेशेवटी तर्कतीर्थ अध्यक्षीय भाषणाला उभे राहिले. 'माझ्या-कडे विषय दिला होता' भारतीय परंपरेतील बुद्धिप्रामाण्यवाद पण येथील भाषणे ऐकल्यावर बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे काय यावर बोलावे असे मी ठरवले.' हे त्याचे वाक्य मोठे सूचक आहे. तसेच, 'शेंड्येशास्त्री याचे आक्षेप हसून टाळण्याजोगे नाहीत. बुद्धि-प्रामाण्यवादाबरोबर शब्दप्रामाण्यवाद हा येतोच.' अशी निःसंदिग्ध शब्दात कबुलीही त्यांनी दिली.

त्यानी अत्यंत तर्कसुसंगत रीतीने 'बुद्धिप्रामाण्य' याची चिकित्सा केली. 'बुद्धी म्हणजे बोध; पण त्याला प्रमाण हे हवेच. प्रमाणे तीन प्रकारची-जाणीव, प्रत्यक्ष व तपासलेले प्रत्यक्ष. इंद्रियाना जे जाणवते ते सुद्धा तपासून घ्यावे. सर्व जाणिवाचा जेथे संवाद होतो तेथे सत्य बाहेर येते.'

'अति समृद्धीने व शास्त्राच्या अतीव प्रगतीने पाश्चात्य लोक अध्यात्माकडे झुकले आहेत; पण आपल्या देशाने मात्र दुष्परिणाम टाळून शास्त्राच्याच प्रगतीवर भर दिला पाहिजे!' या इतराच्या मुद्द्याला त्यानी दुजोरा दिला.

त्याच्या भाषणात विषयातून विषय बरेच निघत होते; पण शब्दांचा कीस वाटत नव्हता.

'तर्कशास्त्र हे सुसंगतीचे शास्त्र आहे' आणि 'विज्ञान हे सर्वात विनम्र शास्त्र आहे,' ही त्यांची दोन विधाने महत्त्वाची आहेत. अभ्यास विपुल असल्याने किती व काय बोलू असे त्यांना वाटले असेल; पण वेळेच्या बंधनाने त्यानी त्याचे भाषण आटोपते घेतले.

निमंत्रक डॉ. शरद अभ्यंकरानी या प्रकारचे मेळावे गावोगावी घेणे, त्याच्या शाखा उघडणे, नव्या विचाराचे मासिक चालवणे अशा काही कल्पना आभारप्रदर्शनाअगोदर मांडल्या; पण लोक बाहेर जाण्याच्या गडबडीत होते. अशा तऱ्हेने साधारण रात्री ८॥ वा. हा मेळावा संपला.

आदल्या दिवशी एका स्थानिक वृत्तपत्रात जी माहिती मेळाव्या-बद्दल दिली गेली होती त्यापेक्षा सभेचे स्थळ वेगळेच (म. सा. प. चे सभागृह) निघाले. वेळ ६ ची जाहीर झाली होती. प्रत्यक्ष सभा ५-३० ला सुरू झाली व वक्त्यांना वेळ ६-३० ची कळवल्याने ते उशीरा आले. हा थोडासा गोंधळ वगळता सभेचे आयोजन चागले होते.

या मेळाव्याने नक्की काय साध्य झाले व तो कितपत यशस्वी झाला हे प्रश्न अखेरीस मनात येणे अपरिहार्य. असो. असो.

—निखिल गजेंद्रगडकर

# एका ब्रिटिश पत्रकाराला काय वाटते ?

'इंग्लंडमधील एकूणच आर्थिक मंदीचा मोठा परिणाम वृत्तपत्र-व्यवसायावर झालेला असून काही वृत्तपत्रं आर्थिक अडचणीमुळं बंद पडण्याची वेळ आली आहे. भारतातील औद्योगिक संबंधच यातून मार्ग काढण्यास आदर्श ठरतील असं मला वाटतं. त्या दृष्टीनं मी पुण्याकडे आशेनं पहात आहे.' लंडनच्या 'इन्स्टिटय़ूट ऑफ जर्नालिस्ट'चे माजी अध्यक्ष व फेलो रेजिनाल्ड होम सांगत होते.

एका ब्रिटिश पत्रकारानं असं म्हटल्यावर मला जरा आश्चर्यच वाटलं. काहीशा आश्चर्यचकित मुद्रेनं मी श्री. होम यांना विचारलं, 'ते कसं बुवा ?' आणि ते मला एकदम आध्यात्मिक पातळीवर घेऊन गेले. 'पुणेपरिसरात एवढे मोठे उद्योगधंदे असूनही संप वगैरेचं प्रमाण कमी आहे, याला कारण पुण्याची संस्कृती!' अशी सुरुवात करून ते म्हणाले, 'अगदी काही शतकांपूर्वीच, नामदेव व तुकाराम हे संत या परिसरात होऊन गेले. ते काही विद्वानाच्या कुळात जन्मले नव्हते; पण त्यानी समाजाला दिलेलं ज्ञान अगाध आहे!'

'सध्याच्या जगातला भ्रष्टाचार आणि अनैतिकता नष्ट करायची असेल तर याच संतांची शिकवण आचरली पाहिजे. सर्व समाजजीवना-वर त्याचा विधायक परिणाम होईल,' अशी खात्री त्यानी व्यक्त केली.

भारताबद्दल ते आदरानं व तेही अभ्यासपूर्वक बोलत असल्यानं मी त्याना विचारलं, 'तुम्ही भारतीय जीवनाचा फार अभ्यास केलेला दिसतो.' यावर ते उत्साहानं म्हणाले, 'मी भारतातच जन्मलो म्हणून एका अर्थानं स्वतःला भारतीय समजतो. १९०९ साली उदयपूरमध्ये माझा जन्म झाला!'

होमसाहेबांचे वडील ब्रिटिश राजवटीत आय. सी. एस. अधिकारी होते. त्याचे काकाही तेव्हाच्या न्यायसेवेत होते. शिक्षणासाठी रेजि-नाल्ड यांची मायदेशी म्हणजे इग्लंडला रवानगी झाली. विसाव्या वर्षी केंब्रिजला शिकत असताना त्यांना 'आपण समाजासाठी काही तरी करावं' असं वाटलं व त्या दृष्टीनं वृत्तपत्रव्यवसायाची निवड त्यांनी केली. वृत्तपत्रव्यवसायात विधायक दृष्टीनं बरंच काही करता येतं, असं त्यांचं म्हणणं आहे.

मात्र कोणत्याही एका वृत्तपत्रात काम करण्याऐवजी विविध विषयावर निरनिराळ्या वृत्तपत्रातून त्यानी लेखन केलं. खोटं बोल-

णाऱ्या, भ्रष्टाचार करणाऱ्या राजकारणी व इतर नेत्यावर वृत्तपत्रानी अंकुश ठेवावा असं त्याचं मत. दरम्यान ते फ्रँक बुकमन यानी जागतिक पातळीवर स्थापन केलेल्या मॉरल-रिआर्मामेंट (एम. आर. ए.) या संघटनेत शिरले. 'जग बदलून टाकण्याच्या ध्येयानं मी त्या वेळी प्रेरित झालो' असं त्यानी सांगितलं.

"जग बदलून टाकणं, हे फार कठीण कर्म आहे किंवा आजचं जग बदलण्याच्या पलीकडे गेलं आहे, असं तुम्हाला वाटत नाही का?" अशी शंका मी लगेचच विचारली तेव्हा ते म्हणाले, "धीर सोडून चालणार नाही. आपल्याच्यानं होईल तेवढं तरी कमीत कमी करावं. *महात्मा गांधींनी भारत स्वतंत्र केला, त्याचे नातू राजमोहन गांधी* जग स्वतंत्र करायला निघाले आहेत. अशा लोकांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवावा!" मॉरल रिआर्मामेंटचा राजमोहन गांधीच्या 'हिम्मत' साप्ताहिकाशी संबंध आहे आणि श्री. होम अधूनमधून 'हिम्मत' मध्ये लिहितात.

होमसाहेबाचं कार्य युरोपात सुरू होतं. १९३० च्या सुमारास ते मॉरल रिआर्मामेंट संस्थेत आले. दरम्यानच्या काळात भारत स्वतंत्र झाला. ब्रिटिश परतले; परंतु १९५२ साली त्याना संस्थेच्या कामासाठी परत भारतात यावं लागलं आणि आपली 'मातृभूमी' असलेल्या भारतात ते आनंदानं परतले.

"पत्रकार म्हणून तुम्ही कधी निवृत्त झालात?" यावर "पत्रकार कधीच निवृत्त होत नाही!" हे त्याचं लगेच उत्तर. आज ७१ वर्षांचं वय असूनही त्याची तब्येत ठणठणीत आहे. "परवापर्यंत मी कलकत्त्यात सायकलवरून हिंडत असे." असंही त्यानी आवर्जून सांगितलं.

"ब्रिटिश वृत्तपत्र कितपत स्वतंत्र आहेत? रेडिओ, टीव्ही कितपत स्वायत्त आहेत?" याबद्दल सांगताना "ब्रिटिश वृत्तपत्रं व रेडिओ-टीव्हीच्या वस्तुनिष्ठतेबाबत जगात सर्वांचंच चांगलं मत आहे. अद्यापपर्यंत तरी बीबीसीनं आपली विश्वासार्हता टिकवली आहे." असं ते अभिमानानं म्हणाले. "वृत्तपत्रावरील आर्थिक संकट मात्र गंभीर आहे," याचा त्यानी पुन:पुन्हा उल्लेख केला.

"छपाईखात्यातील कर्मचाऱ्यांना संपादकीय विभागातील लोकांपेक्षा जास्त पगार मिळतो" हे स्पष्ट करून ते म्हणाले, "अत्याधुनिक यंत्रसामग्री बसवल्यामुळं काही कामगारांवर बेकारीचं संकट ओढवतं. त्यामुळं चिडलेले कामगार संप करून छापखानेच बंद पाडतात. 'टाइम्स'चा वर्षभराचा संप हे प्रमुख व प्रसिद्ध उदाहरण. अशी अनेक उदाहरणं आहेत."

"इतर कामगारांप्रमाणे पत्रकारांची युनियन नाही का?"

"नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्टस ही राष्ट्रीय पातळीवरची संघटना आहे. प्रांतवारी किंवा प्रादेशिक पातळीवर छोटया संघटना आहेत; परंतु सर्व प्रमुख निर्णय घेण्याचा अधिकार नॅशनल युनियनला आहे; एवढंच काय पत्रकारांच्या व्यावसायिक प्रशिक्षणाचं कामही ही संघटनाच पाहते. पत्रकारांमध्येच प्रामाणिकपणा व निर्भयपणा वाढला पाहिजे यावर संघटनेचा भर असतो."

'सरकारी दडपण नसलं तरी जाहिरातदाराचे हितसंबंध, राजकीय दडपण याचा परिणाम कितपत होतो?'

'ही दोन्ही दडपणं इंग्लंडमध्ये नाहीत. ती आणली जात नाहीत. कारण पत्रकारांनीच तसं वातावरण निर्माण केलं आहे. केवळ राष्ट्रीय संरक्षणाशी संबंधित अशाच बातम्या सरकारी विनंतीवरून गुप्त ठेवल्या जातात. अशा वेळी सरकार नोटिस पाठवते, तीही बंधनकारक नसते.

'अनेक घडामोडीच्या मुळाशी जाऊन तपास काढून त्या वृत्तपत्राद्वारे समाजापुढे मांडायच्या, सत्य उघडकीस आणल्याबरोबरच सनसनाटी निर्माण करायची ही लाट आज ब्रिटिश वृत्तपत्रात आली असून 'इन्व्हेस्टिगेटिव्ह' व 'एक्स्पोजिव्ह' अशा प्रकारची पत्रकारिता सध्या जोरात आहे. मात्र काही नियतकालिकं या नावाखाली अश्लील आणि हिंसक गोष्टीचा व्यापार करतात, त्या मानानं भारतीय वृत्तपत्रं बरीच 'सिरियस' आहेत.'

भारतातून इंग्लंडमध्ये रहावयास गेलेल्यांना तिकडे त्रास होतो, त्याचं काय?'

'मी अनेक गोऱ्या व भारतीय कुटुंबांना एकत्र पाहिलं आहे, मूठभर लोकाच्या संघटनेचा विरोध हा देशाचा विरोध समजू नका. शिवाय थोड्याशा वाईट उदाहरणाना प्रसिद्धी मिळते, चांगली उदाहरणं अनेक असूनही ती नजरेआड केली जातात.'

भारतीय वृत्तपत्रांबाबत श्री. होम यानी समाधान व्यक्त केलं. 'भारतीय लोकशाही चीन-रशियापर्यंत पोहोचेल.' अशी आशाही त्यांनी बोलून दाखविली. 'दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी फ्रान्स व जर्मनी या दोन देशांत एकमेकांविषयी पराकोटीचा द्वेष होता. आज दोन्ही देश फार जवळचे मित्र आहेत,' याचा उल्लेख त्यानी या संदर्भात केला. स्वत: श्री. होम यानी फ्रान्स व जर्मनीत कार्य केलं आहे. त्याना फ्रेंच, जर्मन व रशियन भाषा येतात.

सध्या तरी ते पाचगणीला मॉरल रीआर्मामेंटच्या कामात मग्न आहेत. ब्रिटनमधील औद्योगिक अशांततेवर तोडगा शोधण्याचं त्याचं काम चालू आहे. 'नामदेव व तुकाराम या सामान्यातून संत झालेल्या महात्म्याच्या पुण्यभूमीतून यासाठी मार्गदर्शन (spiritual generation) मिळेल,' अशी आशा ते बाळगून आहेत.

**—सोमनाथ पाटील**

# आंध्रप्रदेश

## रेड्डींना तात्पुरते जीवदान

वा दा. रानडे

लोकसभा व विधानसभा निवडणुकात इंदिरा काँग्रेसने मोठा विजय मिळविला; पण त्यानंतर थोड्या महिन्यातच निरनिराळ्या राज्यांत अंतर्गत गटबाजीने डोके वर काढले आहे. हे संघर्ष मिटवून पक्षात एकजूट कशी राखावयाची व आपल्या राजवटीना स्थैर्य कसे आणावयाचे हा इंदिरा गांधीपुढे मोठा प्रश्न आहे.

आंध्रप्रदेशात डॉ. चन्ना रेड्डीचे नेतृत्व बदलण्यासाठी रेड्डी विरोधी गटाने बराच जोर केला होता व त्यांची मागणी जवळजवळ मान्य होणार अशा बातम्या होत्या; पण सध्या तरी तेथील नेतृत्वात बदल करावयाचा नाही असे इंदिरा गांधींनी ठरविले असल्याचे दिसते. डॉ. चन्ना रेड्डी हे त्यांच्याच पसंतीचे नेते. जानेवारी १९७८ मध्ये काँग्रेस पक्षात दुसऱ्यांदा फूट पडून इंदिरा काँग्रेस स्थापन झाल्यानंतर एक महिन्याने विधानसभेच्या निवडणुका आल्या तेव्हा इंदिरा गांधींनी रेड्डींना उत्तर प्रदेशच्या राज्यपालपदाचा राजिनामा द्यायला लावून आंध्रप्रदेशात इंदिरा काँग्रेसची धुरा संभाळण्यासाठी पाठविले. इंदिरा काँग्रेसला मोठा विजय मिळून रेड्डी मुख्यमंत्री झाले; पण अनेक वर्षे राज्याबाहेर असलेला हा नेता पुनः राज्यात आला व आपली नेतेपदाची संधी हुकली म्हणून त्याचे प्रतिस्पर्धी नाराज होतेच. काही महिने एकजुटीचा व सहकार्याचा देखावा करून त्यानी चेन्ना रेड्डीविरुद्ध हालचाली सुरू केल्या.

डॉ. चन्ना रेड्डी काही काळ केंद्रीय मंत्री व नंतर राज्यपाल होते. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून त्यांची निवडणूक रद्द झाली तेव्हा त्याना मंत्रपदाचा राजिनामा द्यावा लागला. वास्तविक असे आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तीची राज्यपालपदी किंवा राज्याच्या मुख्यमंत्रिपदी निवड करणे योग्य नव्हते; पण स्वच्छ कारभारासाठी चारित्र्यवान व्यक्ती निवडण्यापेक्षा आपले राजकीय उद्देश साधण्यास उपयोगी पडणारी माणसे सत्तेच्या पदावर आणणे सत्तारूढ पक्षाला अधिक सोयीचे वाटले.

आंध्रप्रदेशाच्या काही भागात कम्युनिस्टाचा प्रभाव होता. तेलंगण भागात त्यांनी सशस्त्र किसान आंदोलन उभारले होते. मद्रास राज्यातून तेलगू भाषिक भाग वेगळा करून १९५३ मध्ये आंध्रराज्य स्थापन करण्यात आले. तेव्हा मद्रास विधानसभेवर आंध्रभागातून निवडून आलेल्या आमदाराचीच आंध्र विधानसभा स्थापन करण्यात आली. तिच्या १४० सभासदात काँग्रेसचे सभासद ४१ तर त्याखालोखाल ४० सभासद कम्युनिस्ट होते; पण केरळ व पश्चिम बंगालप्रमाणे राज्याची सत्ता हाती घेण्याएवढे कम्युनिस्टांचे बळ तेथे कधीच वाढले नाही. काही भागात नक्षलवादी गटाचा मात्र जोर होता. १९५६ मध्ये तेलंगणभाग आंध्र राज्यात समाविष्ट होऊन सध्याचा आंध्रप्रदेश अस्तित्वात आला. तेव्हापासून तेथील सत्ता काँग्रेसच्याच हाती आहे. काँग्रेसमध्ये फूट पडली तेव्हा ब्रह्मानंद रेड्डी काग्रेसचे अध्यक्ष होते; पण त्याच्या गटाचा काही प्रभाव न राहता बहुसंख्य काँग्रेसजन इंदिरा काँग्रेसच्याच पक्षात गेले. प्रभावी विरोधी पक्ष तेथे निर्माणच झालेला नाही.

इंदिरा कांग्रेसपक्षात मात्र गटबाजी व गटसंघर्ष चालूच राहिले. चन्ना रेड्डी विरोधी गटात चौदा महिन्यांपूर्वी नेतृत्वबदलाचे मागणीसाठी जोरदार मोहीम केली होती. पण त्या वेळी त्याना यश आले नाही. त्यानंतर गेल्या चार महिन्यात या मोहिमेने पुनः जोर धरला. फेब्रुवारी १९७८ च्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आलेल्या मूळ १७५ सभासदापैकी किमान १५० सभासदाचा आपणास पाठिंबा आहे असा दावा या गटाने ३० मार्चला केला, तर रेड्डी गटातर्फे आपल्यामागे २१० सभासद असल्याचा दावा करण्यात आला. विधानसभा इंदिरा काँग्रेसपक्षाच्या सभासदाची संख्या १७५ वरून २३५ पर्यंत वाढली आहे. इतर पक्षामधून इंदिरा काँग्रेसमध्ये आलेल्यांना मुक्त प्रवेश देण्यात आला. म्हणजे साठ आयाराम इंदिरा काँग्रेसमध्ये आले. पक्षात आपली बाजू बळकट करण्यासाठी या आयारामावरच चन्ना रेड्डी यांची मुख्यतः भिस्त आहे. रेड्डीच्या या पाठिराख्याची पक्षनिष्ठा व इंदिरानिष्ठा संशयातीत मानता येणार नाही असे विरोधी गटाचे म्हणणे आहे. महत्त्वाचे निर्णय घेताना आपल्याला विश्वासात घेतले जात नाही ही या गटाची मुख्य तक्रार आहे. सरकारने वीस कलमी कार्यक्रम परिणामकारकपणे अमलात आणला नाही अशीही टीका रेड्डीवर करण्यात आली, संजय गांधींना नेतृत्वबदल हवा होता असेही या गटातर्फे सांगण्यात येत आहे; पण आंध्रप्रदेशात इंदिरा युवक काँग्रेसचा गट महत्त्वाच्या निर्णयांवर प्रभाव पाडण्याइतका प्रभावी नाही. मे १९८० च्या विधानसभा निवडणुकात उमेदवारनिवडीपासून संजयगटाचा प्रभाव दिसून आला; पण आंध्रप्रदेशातल्या निवडणुका फेब्रुवारी १९७८ मध्ये झालेल्या असून त्या वेळी संजयगट एवढा प्रभावी नव्हता. इंदिरा काँग्रेसच्या आमदारामध्ये तरुण व युवक काँग्रेसच्या समर्थकांचा गट लहान आहे. पक्षाची सभा बोलावून आपले बहुमत सिद्ध करण्याची तयारी चन्ना रेड्डी यानी दर्शविलेली आहे.

पक्षाची सभा बोलावून नेतृत्वबदलाच्या प्रश्नावर बहुमताने निर्णय घेणे हाच लोकशाही पद्धतीने हा प्रश्न सोडविण्याचा योग्य मार्ग आहे. विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाची सभा बोलावून या प्रश्नाचा निर्णय घेतल्याचा देखावा इंदिरा काँग्रेसही करील; पण त्यापूर्वी आपणास कोणता नेता हवा याची निवड इंदिरा काँग्रेसचे वरिष्ठ नेते करतील आणि आपला कल स्पष्टपणे दर्शवितील. नेता निवडीच्या सभा म्हणजे केवळ देखावा असतो असा अनुभव यापूर्वी अनेकदा आलेलाच आहे. बहुसंख्य सभासद स्वतंत्रपणे विचार करून मत बनविण्याऐवजी श्रेष्ठीचा कल कोणीकडे हे पाहूनच आपले मत ठरवीत असतात. रेड्डीच्या जागी दुसऱ्या कोणाला नेता निवडावयाचे याबद्दल इंदिरा गांधीचा निर्णय अजून ठरलेला नाही. त्यासाठी त्यांना सवड हवी आहे आणि तोपर्यंतच्या काळापुरतेच चन्ना रेड्डी मुख्य मंत्रीपदी राहणार आहेत. त्याना केवळ काही काळापुरते मिळालेले

पृष्ठ २२ वर

# दिलने जिसे पाया था ऽऽ आँखों ने गँवाया है....

सदानंद बोरसे

हवेवर तरंगत स्वर येताहेत,

" बिछडे सभी बारी बारी..."

समोरच्या वर्तमानपत्रात बातमी दिसतीये,

" कोटयावधी रसिकाना रिझवणारा स्वर हरपला ! "

आणि मन कानावर ओसंडणाऱ्या त्या सुरप्रवाहात डुबण्याचा प्रयत्न करीत त्या बातमीची वास्तवता नाकारतंय, छे, हा माणूस मरेलच कसा ? आता तो रेडिओवर गातोय ऐका. काल टी. व्ही. वर छायागीत झालं, त्या वेळी हा गृहस्थ 'बार बार देखो, हजार बार देखो' गात होता आणि त्या वेळी तो हॉस्पिटलमध्ये अंथरुणावर खिळलेला कसा असेल ? लाखो रसिकाची चोरलेली हृदयं ज्याच्या संग्रही आहेत, तो काय एक हृदय बंद पडल्यानं मूक होईल ?

आणि डोळे पुढच्या मजकुरावरून फिरत होते, 'मुबई दि. ३१– सुप्रसिद्ध पार्श्वगायक श्री. महंमद रफी यांचे आज रात्री १०–२५ वाजता बाँबे हॉस्पिटलमध्ये दुःखद निधन झाले...'

मला आठवतंय, मी पहिली–दुसरीत असेन! सिनेमा, गाणी, नटनटया इत्यादी डिस्नेलँडची तेव्हा नुकती–नुकतीच ओळख व्हायला लागली होती. त्या वेळी सिनेमात कोणी मेलं–बिलं तर मी रडायचो सुद्धा. राजकपूरचा 'संगम' त्यावेळी नुकताच लागला होता. त्यातलं एक गाणं 'ये मेरा प्रेमपत्र पढकर' त्या वेळी मला भयकर आवडलं होतं–अगदी प्रेम, प्रेमपत्र ही लफडी माहीत नव्हती तरीही. आणि ते गाणं तेव्हा बऱ्याच वेळा, बऱ्याच ठिकाणी ऐकू यायचं, मात्र त्यावेळी आमची समजूत–ते गाणं राजेंद्रकुमारनं म्हटलंय. ही समजूत इतकी घट्ट होती की, पुढं ते गाणं महंमद रफी नावाच्या भलत्याच एका माणसानं म्हटलंय, असं कळल्यावर तो माणूस राजेंद्रकुमारसारखा दिसत असणार, असं उगीचच वाटत राहिलं होतं.

तर संगीत, विशेषत: चित्रपट संगीत नावाच्या त्या अजब दुनियेत आम्हाला सुरुवातीला रफी, लता, आणि आशा या स्वर्लोकीच्या स्वरांनी बोटाला धरून हिंडवलं. संगीतकार म्हणजे कोण, त्यांचं नेमकं काम काय असतं, या गोष्टी नंतर कळल्या. सुरुवातीला हेच तीन आवाज कानामध्ये पाय घट्ट रोवून उभे होते. त्या काळत रफीचा दबदबाही इतका जबरदस्त होता की, पडद्यावर कोणत्याही पुरुषानं गाण्यासाठी तोंड उघडलं की डोळे मिटून खुशाल 'रफीचाच आवाज येणार,' हे ओळखावं. 'आराधना' ची किशोरकुमार लाट येईपर्यन्त हिंदी पडद्यावरील बहुतेक सगळे अभिनेते मुख्यत: रफीच्या आवाजात गात होते, वेगवेगळ्या भावछटा रफीच्या आवाजावाटे झंकारत होत्या.

त्यामुळेच रफी गेल्याची बातमी ऐकून एकच आवाज गेल्यासारखं वाटलं नाही मला.

रफी गेला म्हणजे 'तेरे मेरे सपने अब एक रंग है' असं म्हणत प्रेयसीला आश्वस्त करणारा प्रियकर गेला !

रफी गेला म्हणजे 'जिंदगी भर नही भूलेगी वह बरसात को रात' असे सांगत त्या ओल्या रात्री अंजान हसीनाच्या भेटीच्या धुद घटनेचे अत्यंत चित्रदर्शी वर्णन ऐकवणारा गेला.

रफी गेला म्हणजे 'ये महलों, ये तख्तो, ये ताजो की दुनिया। ये इन्साँ के दुश्मन समाजों की दुनिया' असे हृदय पिळवटणाऱ्या आवाजात गात, 'ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है,' असे निराश, हताश गात ती दुनिया जाळून, गाडून टाकण्याचा आक्रोश करणारा शापित कवी गेला !

'ये है इश्क इश्क है' म्हणत धर्म, जात, पैसा, रूप या साऱ्यांच्याहून प्रेमाचे स्थान कसे वरती आहे, हे सांगणारा प्लेटॉनिक प्रेमी गेला

'दिलरुबा, दिल पे तो ये सितम किये जा' मधून वासनेची भडकती आग पेटवणारा कामुक प्रणयी गेला.

'मन रे, तू काहे न धीर धरे' म्हणत स्वत.लाच समजावणारा आणि वाट पाहत राहणारा प्रियकर गेला !

'क्या से क्या हो गया, बेवफा, तेरे प्यार में' म्हणत प्रेमात बसलेली ठोकर पचवणारा प्रियकर गेला !

'याऽहू चाहे कोओी मुझे जंगली कहे' असा आरडाओरडा करीत करीत धसमुसळया उडया मारत नाचणारारा बागडणारा आनंदी जीव गेला !

रफी गेला म्हणजे किती आवाज मुके झाले, याची मोजदाद कशी आणि कोणत्या निकषावर करायची ? कोणीही त्याच्या सहज आठवणाऱ्या सुदर गाण्याची यादी द्यायची म्हणली. तरी हजारभर गाणी सहज देईल.

एक 'दु.ख' या भावनेनं भरलेली, दर्दभरी गाणी घेतली तरी त्यात रफीन कमाल केलेली असते. 'टूटे हुये ख्वाबों ने हमको ये सिखाया है' मध्ये मनात पेरलेलं, पण डोळयांपुढून हरवलेलं स्वप्न शोधण्याच्या प्रयत्नात तो असतो. 'टुकडे है मेरे दिल के ऐ यार, तेरे आँसू' मध्ये प्रेयसीच्या आसवात वाहून जाणारा हळवा प्रियकर तो असतो.'बाबुल की दुआऐं लेती जा' मध्ये पोटच्या पोरीची सासरी पाठवणूक करणारा थरथरता बाप तो असतो. 'वो जब याद आये, बहुत याद आये' मध्ये आठवणीच्या आगीत जळणारा चरागे–मुहब्बत तो असतो. याद में तेरी जाग जाग के हम रात भर करवटे बदलते है' मध्ये गमे-जुदाईत तडपणारा परवाना तो असतो 'हो के मजबूर

मुझे उसने बुलाया होगा ' मध्ये मित्रासाठी तडफडणारा तो असतो. 'कोई सागर दिल को ब्रहलाता नही,' कारवाँ गुजर गया, गुबार देखते रहे,' 'तेरीजुल्फो से जुदाई तो नही माँगी थी,' 'यह आँसू मेरे दिल की जुबान है,' 'ये जिंदगी के मेले '– रफीच्या स्फटिका-सारख्या आवाजातून दु.ख अशी निरनिराळी रूपं घेवून बाहेर पडे.

'पाँव छू लेने दो फूलों पे अिनायत होगी, वरना हमको ही नहीं इनको शिकायत होगी' असे म्हणताना त्याच्या आवाजात असे काही आर्जव असते, प्रेमात अशी काही आदब असते की, प्रेयसीने म्हटलेच पाहिजे, 'आप जो फूल बिछायें उन्हे हम ठुकराऐं ? हमको डर है के ये तौहीमे–मुहब्बत होगी।'

'हम इंतजार करेंगे तेरा कयामत तक। खुदा करे के कयामत हो और तू आये।' हे रफीच्या तोंडून ऐकल्यानंतर प्रेयसी तर धावून येईलच; पण परमेश्वरही प्रलयाची वेळ पुरेशी पुढे ढकलील !

'पर्वतो के पेडों पर शाम का बसेरा है, सुरमई उजाला है, चम-कई अंधेरा है।' हे गाताना एखादे निसर्गचित्र चितारताना चित्र-काराचा कुंचला ज्या हळुवारपणे रंगांची उधळण करेल, तसा रफीचा आवाज वाटतो.

'राही मनवा, दुख की चिंता क्यों सताती है ? दुख तो अपना साथी है।' हे गाणारा रफी म्हणजे तर जीवनातील हलाहल हास्य-मुद्रेने पिणारा आणि पचविणारा स्थितप्रज्ञच !

'सर जो तेरा चकराये या दिल डूबा जाये ' किंवा 'ऐ दिल, है मुश्किल जीना यहाँ ' किंवा 'जंगल में मोर नाचा किसीने ना देखा' किंवा 'मैं बंबई का बाबू, नाम मेरा अंजाना' अशी विनोदी खुसखुशीत कडबोळी पाडणारा रफी जेव्हा 'न किसीकी आँख का नूर हूँ ' गाऊ लागतो, तेव्हा त्या गजलमधून जणू बहादूरशहा जफरचे मूर्तिमंत कारुण्यच आकार घेते. 'गोविंदा आला रे आला ' किंवा 'जानेवाले, जरा होशियार, यहाँ के हम है राजकुमार' किंवा 'मस्त बहारों का मैं आशिक मैं जो चाहे यार करूँ' असे म्हणत मोकाट धिंगाणा घालणारा आवाज 'दूर कोई गायें ' या गीतातील फक्त तानांमधून आर्तता, आवेग व्यक्त करण्याइतका ताकदवान होता. 'मधू बन में राधिका ' मधील तराणा आणि 'जब प्यार किसीसे होता है ' मधील ताल –दोन्हींची गतिमानता सारख्याच सहजतेने पकडणारा लवचिकपणा या आवाजात होता. 'माँग के साथ तुम्हारा ' किंवा 'यू तो हमने लाख हँसी देखे हैं ' मध्ये टांग्याच्या तालावर वा 'अपनी तो हर आह एक तूफान है ' मध्ये आगगाडीच्या तालावर धावणारा हा आवाज 'हम बेखुदी मे तुमको पुकारे चले गये ' वा 'दिन ढल जाये, हाय रात न जाय 'च्या भावभीन्या बरसातीत भिजून जायचा. 'ता कि मै झूठ बोलना ओय ना ' मध्ये रांगडा भांगडा करणारा हा आवाज 'चलो, दिलदार, चलो, चाँद के पार चलो ' मध्ये मोरपिसाइतका हळुवार बनतो.

तलत म्हटलं की, कानात ऐकू येतो तो किंचित कापरा दर्द. किशोर म्हटलं की 'कोई हमदम ना रहा ' पासून त्याच्या यॉडलिंगपर्यंतचा एक मोठा स्पेक्ट्रम कानात घुमायला लागतो. मन्ना डेचे नाव काढताच एखादा ख्यालगायक उगाचच डोळ्यांसमोर येतो किंवा हेमंतकुमार किंवा सचिनदाचे नाव काढले की, एखादा नाव वल्हवणारा नाखवा डोळ्यापुढे उभा राहतो; तसा महंमद रफी म्हटला की, माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो तो एक स्वच्छ नितळ जलाशय. आरशासारख्या स्वच्छ पारदर्शक नितळ मुलायम पाण्याने भरलेला. एखाद्या निसर्गरम्य डोंगराच्या कुशीत विसावलेला. अशा जलाशयात एखादा छोटासा खडा टाकला–खरे म्हणजे खडाच कशाला, एखाद्या गोष्टीचे प्रतिबिंबही पुरेसे असावे– तर त्याच्यात जशा वेगवेगळ्या लांबीच्या, वेगवेगळ्या परिघाच्या तरंगलहरी उमटतील, खळखळाटसुद्धा माजेल, तशा वेगवेगळ्या भावछटा, वेग-वेगळ्या व्यक्तिछटा रफीच्या आवाजात उमटल्या. माकडउड्या मारणारा जितेंद्र आणि ट्रॅजेडीकिंग दिलीपकुमार, चिकणा चॉकलेटी देवआनंद आणि राकट ओबडधोबड शम्मीकपूर, हळवा गुरुदत्त आणि ठोकळा भारतभूषण, कालचा ज्युबिलीकुमार राजेंद्रकुमार आणि आजचा ऋषिकपूर या साऱ्यांना आणि इतर कित्येकांना या आवा-जाचा उदार आश्रय लाभला. फार कशाला, नंतर रफीच्या सिंहा-सनाला सुरुंग लावणाऱ्या किशोरकुमारनेही 'शरारत ' या चित्रपटात रफीचाच आवाज उसना घेतला होता. नौशाद, सी. रामचंद्रपासून रवींद्र जैन, राजेश रोशनपर्यंत असा एकही संगीतकार नसेल ज्याने रफीच्या परीस–आवाजाने आपल्या गीताचे सोने करून घेतले नाही!

वेगवेगळ्या गीतांमध्ये पुनरुक्ती टाळण्यासाठी रफीने केलेला आवाजाचा वा शैलीचा वापरसुद्धा फारच सुंदर होता. अशा जागा कदाचित संगीतकार सुचवत असतील; पण विविधता आणण्यासाठी वाद्याचा आधार न घेता ते रफीच्या आवाजावर विसंबून राहिले, हेही त्याला स्पृहणीयच आहे. अशी काही ठळक गीते म्हणजे– 'हम तो इजहारे हाल कर बैठे, बेखुदी में कमाल कर बैठे ' (मेरे मेहबूब) मधील 'बैठे ' चा उच्चार ऐकावा. 'लेके पहला पहला प्यार ' (सी. आय. डी.) मधील गीत. 'इस रंग बदलती दुनिया में इन्सान की नियत ठीक नहीं ' (राजकुमार).

द्वंद्वगीतांमध्ये वा समूहगीतामध्ये पाण्यात एखादा रंग मिसळून जावा त्याप्रमाणे बरोबरीच्या गायक वा गायिकेचा आवाज रफीच्या स्वच्छ, मोकळ्या आवाजात मिसळून जाई. कुठेही रफीचा आवाज कमी पडत नाही, तसा निष्कारण बरोबरीच्या कलाकाराला वरचढ ठरण्याचाही प्रयत्न करीत नाही. जणू सारे एकजीव झालेले असते, मग 'तू गंगा की मौज मैं जमुना का धारा ' असो वा 'कितना है प्यार तुमको मुझे मेरे राजदार ' असो; 'आँखो ही आँखो में इशारा हो गया ' असो वा 'हम आपकी आँखों में इस दिल को बसा दें तो ' असो; 'जब भी ये दिल उदास होता है ' असो वा 'जो वादा किया वो निभाना पडेगा ' असो; 'दीवाना, मस्ताना हुए दिल ' असो वा 'मै प्यार का राही हूँ ' असो. अगदी आता–आताची 'सरगम ' वा 'आशा ' मधील द्वंद्वगीतेसुद्धा याचीच साक्ष आहेत.

हिंदी चित्रपटामधून माफक मर्यादित शारीरिक लगट करीत प्रेम करणारा, नाचणारा-गाणारा रोमँटिक नायक अशी प्रतिमा उभी करण्यात रफीच्या आवाजाचा फार मोठा वाटा होता. हिंदी सिनेमा दुर्दैवाने त्या चक्रात सापडून नंतर गरगरला तरी त्यामुळे अवीट गोडव्याने भरलेल्या रफीच्या गीताचे मोल बिलकुल कमी होत नाही. 'तेरी प्यारी प्यारी सूरत को किसीकी नजर ना लगे ', 'बहारो फूल बरसाओ ', 'दीवाना मुझसा नही इस अंबर के नीचे ', 'खुली पलक

पृष्ठ २१ वर

कथा

# बापू

कुंदन पुरी

'उचला रे ऽ!' म्हणायचा अवकाश की चौघं चार बाजूला झाली. एकानं मडकं धरलं. गोसाव्यांनी शख फुंकला. मसणजोग्याची घंटी वाजली. मांगाची सूर...सनई वाजली. डफडी वाजली. त्यात बँडचे सूर मिसळले!

पालखी निघाली. सात-आठ बाया पदरांनी वारा घालू लागल्या. कित्येकांनी फुलं उधळली, तर कित्येकांनी पैसे. कित्येकांनी डोळे टिपले, तर कित्येकांनी उचंबळून आलेल्या भावनांना आवर घालून जयजयकार केला, 'बापू की जय! बापू अमर है।'

पालखी मुंग्यांच्या पावलानं पुढं सरकू लागली. श्रद्धाळू माणसं पालखी थांबवीत. बापूवर कुंकू...गुलाल...फुलं उधळत. नमस्कार करत. पालखीच्या पुढं भजनी मंडळी गात होती, 'रघुपति राघव राजाराम...!'

बापूंचा प्रवास सुरू झाला. प्रवास...न परतीचा. वातावरणाच्या गंभीरतेत उदबत्त्या व उदाच्या सुवासिक धुरानं भर पडली.

'सर...नमस्कार!' सदानंदांना बघून एका विद्यार्थ्यानं हात जोडले. सदानंद-प्राचार्य! शर्ट-पायजाम्यात! चेहरा उतरलेला. गोंधळलेल्या त्या विद्यार्थ्यानं चाचरत विचारलं, 'सर...आपण...इथं?' ते काहीच बोलू शकत नव्हते. त्यांनी मान खाली घातली. विद्यार्थी गेल्याच पाहून त्यांनी अश्रू टिपले.

पालखी चालू होती. सदानंदाचे पाय देखील चालत होते; पण त्यात जीव नव्हता. डोळ्यांना काहीच दिसेना. अश्रू आवरत नव्हते. आंतरिक उमाळा आवरता येईना. 'मी इथं कसा?...बापू माझं कोण...?' या प्रश्नाचं उत्तर शोधण्यात त्याचं मन गुंतलं! आठवणींच्या जगात ते शोधू लागले त्यांचं बालपण...

आठवणींची रिळ उलगडत गेली..

सदा-एक पाच वर्षांचं पोर. विषमज्वरानं आजारी पडलेलं, खाटेला खिळलेलं. बापूच्या तोंडचं पाणी पळालं. जिवाची तगमग. गोंधळ.

बापूंची नुसती धावाधाव. कधी या वैद्याला बोलाव तर कधी त्या मांत्रिकाला बोलाव. कधी देवीचा अंगारा आणून लाव, तर कधी देव्हाऱ्यातील पांडुरंगाला साकडं घाल. गदगदलेल्या अंतःकरणानं ते म्हणत,

'पांडुरंगा, माज्या सदालं बरं कर! मी पंढरीची वारी करीन!'

बापू घटघा-घंटयाला ताप बघत. तापाचा चटका त्यांचं हृदय जाळत असे.

सात-आठ दिवस झाले. ताप कमी झाला नाही. मग बापूंनी त्याला खांद्यावर बसवून नांदेड गाठलं. चार मैल जंगल पायी तुडवलं. डॉ. साठ्यांना दाखविलं. डॉक्टरांनी तपासून गोळ्या दिल्या. त्यांनी इंजेक्शन द्यावं असं बापूंना वाटलं म्हणून ते घुटमळत म्हणाले,

'डागदरसाहेब, इंजेक्शन...'

'...काही गरज नाही!'

'पन...ताप किती आलाय! साताठ दिसापासून पोर उपाशी हाये...'

'काही काळजी करू नका...होईल बरा...' बापूंनी खिसा चाचपडला. डॉक्टर म्हणाले, '...नंतर द्या...'

'बरं ऽऽ!'

लोळागोळा झालेल्या सदाला त्यांनी घरी आणलं. ताप तीन आठवडे उतरला नाही. दर दोन-तीन दिवसांनी बापू सदाला घेऊन दवाखान्यात जात. दाखवत. औषध घेऊन परत येत.

ठणठणीत बरं व्हायला दीड महिना लागला. या काळात बापूंनी जिवाचं रान केलं, नांदेडला चकरा मारल्या. जास्तीचं काम करून पैसा जमवला. पैसे देण्यासाठी ते डॉक्टरांना भेटले. कृतज्ञतेनं त्यांचं मन भरून आलं.

'डागदरसाहेब, माजा सदा बरा झाला. तुमच्या हाताला यश आलं.' असं म्हणत त्यांनी पैसे डॉक्टरासमोर धरले.

'बरा झाला नं पोरगा...अं? हं...मला तेच हवंय! पैसा नको!'

'क...क...काय? फी नको?' बापूंना आश्चर्य वाटलं. फी न घेणारा डॉक्टर ते आजच पाहात होते! डॉक्टर स्मित करीत म्हणाले, 'बापू, मला फी नकोय!'

'...का पन?'

'फी उकळायला मला दुसरी श्रीमंत माणसं आहेत ना?...बापू, मी तुम्हाला चांगलं ओळखतो!'

'मंजे...कसं?'

'तुमच्या इथले नानासाहेब जोशी आहेत ना, ते माझे मामा!...तुमची परिस्थिती मला माहीत आहे बापू! तुमचा मुलगा काय अन् माझा काय सारखेच!'

बापूंच्या डोळ्यात पाणी आलं. सद्गदित अंतःकरणानं ते म्हणाले, 'डागदरसायब... तुमचे उपकार...ह्या जलमी नाही फिटायचे!'

बापू पटकन् खाली वाकले. पाय धरणार तोच डॉक्टरांनी त्यांना उठवलं. बापूंच्या पाठीवरून हात फिरवला. 'बापू, देवाच्या पाया पडायचं असतं...'

'डागदरसाहेब, माज्या पोराचा नवीन जलम झाला. तुमीच देव झालात...कसे उपकार फेडू?'

'बापू, मन छोटं का करता...? फी द्यायची आहे ना? ठीक...एक दिवस माझ्या घरी या! माझ्या कृष्णाला झकास कथा सांगा. झालं!'

डॉक्टरांचे आभार व्यक्त करायला बापूजवळ शब्द नव्हते. त्यांनी निमूटपणे डॉक्टरांचा निरोप घेतला.

घरी येता येता त्यांनी देव्हाऱ्याकडं धाव घेतली. 'पांडुरंगा...पांडुरंगा...डागदराच्या रूपानं तू पावलास! माजं...मायविना पोर वाचलं!...' डोळ्यातून अश्रू वाहू लागले. जवळच उभा असलेल्या सदानं हाक मारली, 'बापू ऽऽ!' बापूंनी त्याला आवेगानं जवळ घेतलं. ते त्याचे पटापट मुके घेऊ लागले.

आई घेणार नाही एवढी काळजी बापूंनी घेतली. घरी अठराविश्वे दारिद्र्य! पोरासाठी अहोरात्र काम केलं. येणारा पैसा, फळं, दूध, खारका, मनुका यात खर्च केला सदाची

प्रकृती झपाट्यानं सुधारू लागली.

बापू...एक चिवट माणूस...जिद्दी माणूस ...हरहुन्नरी माणूस. कपडे छान शिवायचा. गोड गोड बोलायचा. वाजवी भाव घ्यायचा. जुने कपडे उसवले...फाटले तर फुकटात शिवायचा. सदा हसतमुख. बडबडा. कामात गुतलेला, काम कोणतंही असो...कपडे शिवायचे असोत अथवा चिंध्याचे पक्षी बनवायचे असोत– मन लावून करणार. बाळाच्या पाळण्यावर चादवा शिवावा बापूनीच ! बैलाच्या झुली खुलवाव्यात बापूनीच !

सार्वजनिक उत्सवाच्या वेळी बापूची धडपड पाहावी. गणपतीउत्सव आला...दारोदारी हिंडून वर्गणी गोळा कर. गणपती बसव. आरत्या कर. कीर्तनं, भजनं, बोलाव. साऱ्यांची व्यवस्था कर. स्वतःचा पैसा टाक... पण कुणाची आबाळ होऊ द्यायची नाही. देवाना नमस्कार करायचा भयंकर उल्हास ! सोमवारी–शकराचं, मंगळवारी–भवानीचं, गुरुवारी–दत्ताचं, शनिवारी–शनीचं. एकादशीला–केशवराजाचं... शुक्रवारी हाजी सैयाचं दर्शन घेतलंच पाहिजे ! उपवास तर नित्याचेच.

बापूचा वाघ नाचला नाही अशी एकही मिरवणूक .... हिंदू–मुसलमानाची .... अद्याप निघाली नाही. पोरं म्हणायची, 'बापू, तुमचा वाघ नाचल्याबगर कार्यक्रमाला मजा नाही!' 'बापू, चढलेच हरबऱ्याच्या झाडावर ! अंगावर काळे पट्टे ओढून, वाघाचा मुखवटा चढवून, शेपूट लावून बापू अशा रीतीनं नाचायचे की पाहाणारे उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवत. शिट्ट्या वाजवत ! 'बापू जिन्दाबाद !' म्हणून आरोळ्या ठोकत. डफडेवाले जोशात यायचे ! बापूच्या पाऊल उचलण्यात.... टाकण्यात एक प्रकारचा नखरा असायचा. बापू रात्र रात्र जागायचे....नाचायचे !

लोकही, गंमत्ये. बापूच्या अंगाला शाई फासत. डोक्यावर नकली केस ठेवत. त्यावर बेगडाचा एक टोप ठेवत. मोठाल्या मिशा लावत. भुवया रंगवत. रेड्यावर बसवत. खालच्या ओठावर अन् नाकपुड्यात बसतील अशा दोन बोरूच्या काड्याचे तुकडे बसवत. एका हातात मोठी बेगडाची गदा व दुसऱ्या हातात रेड्याचे दोर असा हा यमराज डोळे वटारून पोराना व गदा उगारून मोठ्यांना भिववीत असे !

बापू म्हणजे वल्लीच. त्यांचा विचू बघून लोक तोंडात बोट घालत. बापू उलटं होऊन हातावर चालत...विंचवासारखं.. हळू-हळू...तुरूतुरू....

बापूचा आहार तसा कमीच; पण पंक्तीत मात्र ते खाण्याची पैज लावत. कोण जास्त खातंय ! एकदा तर ते एवढे जेवले की रात्रभर पोटदुखीनं हैराण झाले.

अनेक माणसाच्या गुणांचं एकत्रित रसायन म्हणजे बापू ! बापू...पोथ्या वाचणारे, भजनं म्हणणारे, सोग घेऊन भारुडं म्हणणारे ...हावभावासकट कथा सांगणारे....

डॉ. साठ्यांकडे ते आठवणीनं गेले. बरोबर सदा होता. रात्रभर त्याच्याकडे राहिले. त्याच्या कृष्णाला कथा सांगितली. श्रीकृष्णानं भीमाचं गर्वहरण केल्याची कथा बापूनी अशा रीतीनं सांगितली की ऐकणारे सतत हसत राहिले !

बापू म्हणजे गावचा जीव ! हा जीवच शरीर सोडून चालला तेव्हा उभा गाव हळहळला !

'बापू, राहा की इथंच. इथं राहूनच शिकवता येईल पोराला !' कुणी म्हणे.

कुणी म्हणे, 'बापू, पैसा हवा का ? मी देतो !' बापू म्हणाले, 'माजे मायबाप हो, तुमच्या प्रेमाचा खजिना मजजवळ असता तुमच्या पैशाला घेऊन काय करू ? तुमी एवढी माया केली या बापूवर की गाव सोडून मला बी जावं वाटत नाही; पण...सदासाठी मी जातोय; त्यो शिकला पाहिजे. त्यो साठेसायेबासारखा डागदर व्हईल....तुमची साऱ्यांची सेवा करील ..आन् नादेड ते काय? हाक मारा, हा बापू अर्ध्या रात्री धावत येईल !' असं म्हणत बापूनी उपरण्यानं डोळे पुसले. गाडीवानाला इशारा केला. बापूचं सामान घेऊन गाडी नांदेडला पोहोचली.

नादेडमधील बापूचा एकमेव आधार म्हणजे डॉ. साठे ! साठ्यांनी जुन्या नादेडात एका चाळीत एक छोटंस पत्र्याचं घर शोधून दिलं. सदाचं नाव एका शाळेत टाकलं. या नांदेडात अन् बापूच्या गावात फारसा फरक नव्हता. बापूनी बघता बघता स्वतःचा जम चांगलाच बसविला. ते तेथील लोकात मिसळले. लोकाच्या गळ्यातील ताईत बनले!

सदा हुशार निघाला तल्लख बुद्धीचा.... अचाट स्मरणशक्तीचा. बापासारखाच धडपड्या शिक्षकाचा आवडता. कुणी पुस्तकं पुरवली. कुणी फी भरली. कुणी कपडे शिवले. बघता बघता सदा मॅट्रिक पास झाला. बापू आनंदानं वेडे झाले. डॉक्टराना पेढे दिले. आपल्या गावी गेले. तिथल्या केशवराजापुढं पेढे ठेवले, 'पांडुरंगा.. .तुज्या आशीर्वादानं पोर मॅट्रीक झालं...अशीच क्रिपा असू दे !' नमस्कार केला. सदाला पण नमस्कार करायला लावला.

'माजा सदा मॅट्रीक पास झाला. माजा सदा पास झाला !' असं सागून सांगून घरोघरी पेढे वाटले.

सदा डॉक्टर व्हायला हैदराबादला गेला अन् एम्. ए. ची डिग्री अन् पत्नी घेऊन परत आला. पुस्तकं वाचायच्या ऐवजी प्रेमाची बाराखडी गिरवली. परिणाम सतत दोन वर्षे नापास ! म्हणून फॅकल्टी बदलली.

बापू मनातून नाराज झाले. पोरगा 'डागदर' झाला नाही. परजातीच्या मुलीशी लग्न केलं अन् तेही त्याला एका शब्दानं न विचारता ! न कळवता ! बोलावलं फक्त अक्षता टाकायला. परक्यासारखं ! बापूनी मनाला समजावलं, 'मर्जी पांडुरंगाची ! पोराचं दैव ! आपुन आपल्या परीनं केलं... पोराला त्यात गोडी वाटली, ना? मंग झालं !'

सदा तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक झाला. त्याची पत्नी...शीला...मराठीची प्राध्यापिका झाली...अन् बापूचं घर बदललं. आता ते सिमेंटक्राँकीटच्या आधुनिक पद्धतीनं सजवलेल्या बंगल्यात आले. वस्ती बदलली. विद्यानगरी ! विद्वानाची नगरी ! व्यापाऱ्यांची नगरी ! सतत कामात मग्न असलेली माणसं. सतत धावपळ करणारे. काम नसलं तरी घरातच बसणारे ! इथल्या लोकांना सार्वजनिक जीवन नव्हतं. वर्षातून एक किंवा दोन कार्यक्रम होणार...त्यातही पोरंच भाग घेणार. कथा–कीर्तन नाही. उपवास करणार...एक सवय म्हणून. देव पूजणार-एक उपचार म्हणून.अगदीच शांत वातावरण!

एका घरातील झोपण्याची जागा बदलली तर माणसाला झोप येत नाही. इथं तर बापूच्या भोवतालचं जग बदललं. इथं नाही दारिद्र्य...अज्ञान... श्रद्धा...दुसऱ्याबद्दलची आस्था! सदा बदलला...सदानद गोसावी...

अंहं...' प्रा. गोसावी झाला!' बापूच्या अंगावरचे कपडे बदलले; पण मन ? बापू बदलण्याच्या पलीकडे गेले. बापू आयुष्याच्या अशा चौरस्त्यावर आले की त्यांना कुठला मार्ग निवडावा ते कळेना. उरलेलं आयुष्य अन् रिकामा...भयाण...वेळ याचा मेळ कसा घालायचा ? बायको देवा घरी गेली तेव्हापासून बापूंचं खाजगी जीवन संपलं ! राहिलं ते सार्वजनिक जीवन. जनमानसाच्या लाटांवर तरंगणं हेच बापूंचं जीवन. आता लोकात मिसळता येत नव्हतं. कपडे शिवण्याचा धंदा सुरू ठेवणं बरोबर वाटत नव्हतं.

शेवटी बापूंनी एक तंबोरा विकत आणला. चिपळ्या आणल्या. भजन सुरू केलं. वेळ... काळ ? छे ! भगवंताच्या नामस्मरणाला वेळ–काळाच्या मर्यादा नसतात ! श्रद्धा... जिव्हाळा...प्रेम...याला बंधनं नसतात. सुशिक्षितांच्या घरातून रेडिओचे सूर... पोरांनी म्हटलेली आचरट गाणी हे विसंगत वाटत नाही; पण तेच कुणी भजन करायला लागलं की कसं विचित्र वाटतं ! सुनेला आपला सासरा म्हणजे एक अजब प्राणी वाटे. वेळी–अवेळी बापूंनी 'ओरडत' राहावं हे तिला मंजूर नव्हतं; पण म्हणायचं कसं ? साऱ्या घरालाच अस्वस्थतेनं पोखरलं.

दुष्टचक्रातून सुटण्यासाठीच बापूंनी सदानंदाला एका सकाळी म्हटलं, 'सदा...मी पंढरीला जाईन मंतो...'

'जाऊन या...सारखं घरात बसून माणूस कंटाळतो...'

'हं...मी तेच तर मंतो ! एक्या ठायी बसणं मला ठावं नाही...तव्हा...!'

'ठीक आहे ! केव्हा जाणार ?'

'जमलं तर उद्या सकाळी ! ...'

'ठीक आहे !'

बापूंना वाटलं, पोरगा चार–आठ दिवसांनी जा म्हणेल पैशाचं काही बोलेल. पण...छे...

तरुण नवविवाहितांना घरातील म्हातारी माणसं अडगळीसारखी वाटतात, हे बापूंना माहीत नव्हतं...

बापूच्या जीवनाची चक्रं सुरू झाली. पंढरीचं निमित्त करून बापूंनी घर सोडलं... भटकंती...कधी इथं, कधी तिथं ! कधी खेड्यावर, तर कधी जुन्या नांदेडात, 'आपल्या' माणसात. कधी एखादी रात्र मुलाकडे.

बघता बघता चार-पाच वर्षं निघून गेली. सदानंदनं पीच. डी. केलं. एक मुलगा झाला. बापूंना कोण आनंद झाला ! साऱ्यांना सांगत सुटले, 'मी आजोबा झालो...मी आजोबा झालो...बस, आतां वणवण हिंडणं बंद ! नातास कडी-खादी खेळवायचं अन्...दोन घास खाऊन देवाचं नाव घ्यायचं !'

बापूंची स्वप्न त्यांच्यासारखी वेडी... लहानग्याला सांभाळायला एक बाई आली. बापूंनी लहान मुलाला घेऊन बसावं, हे सुनेला मंजूर नव्हतं. मुलाला खेळवणं वेगळं अन् घेऊन बसणं वेगळं...मुलगा आठ-दहा महिन्यांचा झाला. हसायला लागला. पोटावर पडायला लागला तेव्हापासून बापूंचा वेळ मजेत चालला....बापू निरनिराळे आवाज करत. लहानगा हसत हातपायाची सायकल जोरात चालवे...सुनेलाही बरं वाटे...

पुन्हा दुसऱ्याची चाहूल लागली. याच वेळी सदानंदाची परभणीला प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. अर्थात शीलाला देखील नोकरी मिळाली योगायोग ! बापू म्हणाले, 'सूनबाई, माजं बोलणं लक्षात ठेव. मला नातू होणार. चांगल्या पायगुणांचा. त्यो तर नक्कीच डागदर होणार !'

'ढोराचा !' सदानंदानं हसून म्हटलं.

'ढोरांचा तर ढोराचा ! कुणाचा का होईना...मुक्या जनावराचा आशीर्वाद मिळंल !' बोलाफुलाला गाठ पडली. बापूला दुसराही नातू झाला. पहिला चिंटू अन् दुसरा पिंटू.

*बापूंचे काही दिवस मजेत गेले. नंतर मात्र* करमेना. शहर नवीन. कोणाला बोलायचं ? ऊठसूट पोराबरोबर किती खेळायचं ?

गणपतीविसर्जन ! प्रचंड मिरवणूक निघाली. बापू बघायला गेले. एका ठिकाणी वाघ झालेली पाच-सहा मुलं उड्या मारत होती नुसत्या उड्या. हे काय वाघ नाचवणं झालं ? 'ये पोरांनो, उगीच उड्या मारताय ! जमिनीला लाथाडणं मंजे नाच नव्हं !'

'पावणं, या की मैदानात !' एका पोरानं आव्हान दिलं.

'व्हय ! भितो का मी !' म्हणत बापूंनी धोतर वर ओढून गच्च बांधलं. डफडेवाल्याला म्हणाले, 'ह ?गो बडवणं म्हणजे वाजवणं नव्हे...बघ, अशी वाजव ! ...' त्याला त्यांनी डफड वाजवून दाखवलं. त्यांच्यातला वाघ जागृत झाला. एका विशिष्ट लयीत पावलं पडत होती. चेहऱ्यावरचे भाव बदलत होते. शिकारी आल्यावर दबकत दबकत चालणारा वाघ...वेळ साधून शिकाऱ्यावर झडप घालणारा वाघ...त्यांनी हुबेहुब उभा केला. वाघासारख्या आरोळ्या ठोकल्या ! पोरं खुश झाली. त्यांनी बापूंना उचललं, नाचली त्यांना घेऊन. मग एका मुलानं विचारलं, 'पाव्हणं, तुमचं नाव काय ?'

'रामगिरी...गोसावी'.

'गोसावी ? मंग आमचे प्रिन्सिपाल कोण तुमचे ?'

'त्यो तर माजा ल्योक हाये !' बापू उत्तरले.

बापू एका रात्री एका भजनी मंडळात घुसले. पदं गाऊन दाखविली.

झालं. माणसं नेहमीच बापूंना शोधू लागली.

सदानंदाला बापूंचं वागणं पटेना. लोकांना टाळता येईना व बापूंना नाही म्हणता येईना. आपल्यासारख्या विद्वान प्राचार्याचा बाप गल्लीबोळात नाचावा, यापेक्षा दुर्दैव ते कोणतं ?

मोहरम. सवाऱ्या उठल्या. मिरवणूक निघाली. बापू बघायला गेले. लोकाग्रहास्तव बापूंनी रंग फासला. तिथं एक दोन घटका नाचले अन् तसेच घरी आले. शीला व सदानंद घरी नव्हते. चिंटू पिंटू घाबरली; पण 'हा तर आपला बापू !' असं समजल्यावर पोरं *खिटावली 'चितूपितू' वाघ पाहयचाय?'* बापूंनी विचारलं. पोरं मानेने हो म्हणाली. बापूंनी तोंडानं, 'डंक चिक डगा.. डंक चिक डंगा !' आवाज काढला. उड्या मारू लागले

त्याचा वाघ जोशात यायला आणि सून व मुलगा परतायला एकच वेळ झाली. सदानंद भडकला. तो ओरडला, 'बापूऽ काय हा मूर्खपणा ! बाहेर बावळटासारख नाचता ते पुरे नाही वाटतं. आता घरी धिंगाणा सुरू केलाय ! मी इथल्या कॉलेजचा प्राचार्य आहे. एका प्राचार्याचा बाप पोरकटासारखा उड्या मारतो हे ऐकून मला लाज वाटते ! गावात प्रतिष्ठा राहात नाही. कमाल झाली तुमच्या वागण्याची ! मला किळस येते या प्रकाराची

सदानंदचे शब्द म्हणजे तापलेलं तेल. बापू स्वर्गातून पृथ्वीवर आदळले ! 'माजो किळस येते...या बापूची !' बापूचं विचारचक्र सुरू झालं. बापू अंगणातच बसले. सदानंद पोराना ओढतच आत घेऊन गेला.

बराच वेळ झाला. बापू बसलेले. शीला दोनदा येऊन गेली. म्हणाली, 'बापू...हात-पाय तोंड धुवा. चहा झालाय.' बापू हलले नाहीत. सदानंद आला. म्हणाला,'चला. चहा थंडा झालाय. हातपाय धुवा...नसता तमाशा नको !'

'मी तमाशा केला ? खरंच का ?' बापू विचार करत उठले. हातपाय–तोंड धुतले. चहा घेतला

घरात चिटूपिटूनी धुडगूस घातला, 'डंक चिक डंगा !' सदानंद खेकसला 'ये पट्ट्यांनो, चूप बसा ! साल्यानी नस्ता तमाशा लावलाय्...चिटू, तू बाराखडी लिही अन् पिटू, तू उजळणी ! चला...' पोरं चूप झाली. घर शांत झालं.

सायंकाळी बापू धड जेवले नाहीत. सारा जीवनपटच त्यांच्या नजरेसमोर उलगडत होता. सदा चार–पाच महिन्यांचा होता तेव्हाच त्यांची पत्नी वारली. बापूनी मोठ्या कष्टानं त्याला वाढवला. पोरगा स्वभावानं हुड होता. बराच त्रास झाला; पण बापू कधी रागावले नाहीत तोच हा सदा...सदानंद...प्राचार्य सदानंद गोसावी...

बापूना झोप येईना. आपल्यामुळं याची प्रतिष्ठा जाते...मग इथं राहायचं कशाला ? उलटसुलट विचारानं बापू हैराण झाले..., शेवटी निर्णय घेतला. घर सोडायचं ! बापूनी बरीच शोधाशोध केली तेव्हा कुठं एक पेन्सिलीचा तुकडा मिळाला. एका चुरगळलेल्या कागदावरच त्यानी थरथरत्या हातानं लिहिलं

'सदा...माज्या लेकरा...येतो मी ! दुक करू नको ! मी जिवाचं वाईट करत नाही ! जगण्याचा प्रश्न माज्यापुढं कधीच नव्हता. त्यो पांडुरंग जगवीलच कसा तरी...पोरा, तुज्यासाटी मी माज्या आयुष्याचं माळरान केलं ! तुजी माय मेली तेव्हाच मी पागल झालो असतो...पण मी रान धरलं. का ? तर माहा लेकरू ! तुज्यासाटी मी जगलो.— पिलं लहान असतात तंवर काळजी ! पंखात बळ आलं...पिलं उडाली ! पक्षिणीचं काम संपलं...मी कुटं बी असू दे—माजा जीव इथं राहील. या येड्यामुड्या बापूचे आशीर्वाद नेहमी तुज्या बरूबर असतील! पांडुरंग साऱ्यांचं भलं करो !'

कधी नव्हे ते बापू रडले. लहान मुलासारखं ! ओक्साबोक्सी रडले !

सारं घर शांत होतं. सकाळी चारच्या दरम्यान बापूनी घर सोडलं. अंधाऱ्या रात्रीनं त्यांना आपल्या शालीत दडवलं.

या अंधाऱ्या रात्रीनं बापूचा गेल्या बारा-तेरा वर्षांचा इतिहास दडपून ठेवला. बापू कसं जगले...कुठं गेलं...त्यानी काय त्रास सहन केला हे एक त्या बापूना माहीत, नाही तर त्यांच्या पाडुरंगाला !

सदानंदाची भरभराट झाली. पगार वाढला. स्वतःचा बंगला झाला. कामाचा व्याप वाढला. कधी कधी तर त्याना पेपर वाचायलाही वेळ मिळत नसे. एका रात्री झोपताना त्यांची पत्नी म्हणाली, 'अहो, आजचा पेपर वाचला का ?'

'नाही. वेळ मिळाला नाही. का बरं ?'

शीला घुटमळली. पेपरमधील एक फोटो दाखवत म्हणाली, 'हा फोटो मामंजीचा तर नाही ?'

*'बघू...' झोपलेला सदानंद उठून बसला.* 'अग, हो की ! हे तर बापू !' त्याला आनंद झाला. बापू ! आपला बापू आला !

'पण...हे बघा...काय छापलंय ते...' तो वाचू लागला. ह० भ० प० तुकारामबापू महान संत ! ज्ञानेश्वरी व संतसंप्रदायचा सखोल अभ्यास असलेला महापुरुष ! आपल्या मधुर वाणीनं व प्रभावशाली कीर्तनानी ज्यांनी पश्चिम महाराष्ट्र व संपूर्ण विदर्भ प्रभावित केला ते बापू आज परभणीत आले. विश्वेश्वराच्या मंदिरात नामसप्ताह सुरू होत आहे. दररोज रात्री भाविकांना बापूचे


**गांधी खून घटनेवर वेगळा प्रकाश**




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

कीर्तन ऐकण्याचा लाभ घेता येईल !'

'ही माहिती तर वेगळी वाटते !' शीलाची शंका.

'हं...खरंच ! फोटो तर बापूचाच वाटतोय् ! पण...'

'नाव थोडं वेगळं वाटतंय...कदाचित बापूच असावेत !' 'माझं तर डोकं गरगरायलं ! बापू गेले तेव्हाही असंच झालं होतं. मला काही सुचत नाही !' सदानंद म्हणाला.

'असं करू या. उद्या मी जाते कीर्तनाला.'

'तू ? अन् कीर्तन !...बरं दिसेल ?'

'कसंही दिसेना; मला काय, बापूवर आपण अन्याय केलाय ! आपणच त्यांचे पाय धरावेत. घरी घेऊन यावं. म्हातारा जीव कुठं कुठं भटकेल?...मी उद्या जाते. बापूच आहेत अस वाटलं तर तुम्ही घेऊन या !'

'ठीक ! चिटू-पिटूला बघून बापूंना किती आनंद होईल !'

'हो ना ! तेव्हा मुलं अगदी लहान होती...'

बापूंना घरी आणायचंच असा विचार करत ती दोघं झोपली.

शीला कीर्तनाला गेली तेव्हा ते अगोदरच सुरू झालेलं होतं. शीलानं तेव्हाच ओळखलं...हे तर बापू ! कपडे बदलेत. भगवे केलेत. बापू थोडे थकल्यासारखे वाटतात; पण आवाज...खणखणीत आहे.

बापू अभंग गात आहेत. 'पतितपावन नाम ऐकुनी आलो मी द्वारा ! पतितपावन न होसी म्हणुनी, जातो माघारा !'

बापू बराच वेळ गात होते. नंतर भजन्यांना थांबवून प्रसंग खुलवून सांगू लागले. '...नामदेव पापी ! याचं पाऊल पंढरपुरात नको म्हणून देवानं चंद्रभागेला हुकूम केला. ती दुथडी वाहू लागली. तेव्हा नामदेवाला लई वाईट वाटलं. म्हणून हा अभंग त्यांनी म्हटला. त्यो म्हणाला, 'देवा, मी तर पापी हायेच ! पण तू पतितपावन हायेस म्हणून मी धावत धावत आलोय. मी तुज लेकरू. मला जवळ घ्यायचं तं तू दूर लोटत्यस... ठीक हाये ! मी जातो. मायेच्या दारानं मी परततो...महाराजा, पांडुरंगाचं मन बापाचं ! लेकरू कितीही अवखळ...पापी असलं तरी बाप हृदयाशी लावतो ..'

हा साधा प्रसग बापूनी अशा रीतीनं सागितला की भाविकाच्या डोळ्यात पाणी आलं. बापूनीही स्वत.चे डोळे पुसले.

बदलेले बापू पाहून शीला तर गोंधळीच. श्रोत्यांच्या काळजाला हात घालण्याचं सामर्थ्य बापूच्या वाणीत होतं. शीलाला भास झाला...बापू जणू स्वत:ची कैफियत मांडत होते ! शीलानं विचार केला. 'मी एम. ए. मराठीची प्राध्यापिका. कित्येक विवसापासून संतवाङ्मय शिकवते. आज शिकवल की मुलं उद्या विसरतात. का ?...आमची विद्वत्ता कुचकामी ! केवळ पोपटपंची ! शिकवायचं म्हणून शिकवायचं. त्यात जिव्हाळा नाही...आस्था नाही !'

ती तर बापूच्या ज्ञानानं...वाणीनं अभिनयानं...भारून गेली. 'या माणसाला आम्ही समजू शकलो नाही' हा विचार तिला त्रास देऊ लागला. संवेदनाक्षम मनाची शीला घरी आल्यावर नवऱ्याच्या गळयात पडून खूप रडली. तोही गोंधळला. हादरला. 'उद्या बापूना मी घरी आणतो,' असं आश्वासन त्यानं दिलं तेव्हाच ती शांत झाली.

सामान्य माणूस बापूपर्यंत सहज पोहचत असे; पण सदानंदला फार अवघड वाटू लागलं. एक प्राचार्य...प्रतिष्ठा...बराच वेळ विचारात गेला. शेवटी साधे कपडे करून तो बापूस भेटायला गेला. आजही कीर्तन सुरू झालं होतं. निरूपणाचा अभंग होता. 'का रे नाठवीसी । कृपाळू देवासी । पोशितो जगासी । एकलाचि !'

'तुकोबा तुमाआमास इचारतात की बाबानो, त्या देवाला का इसरलात ? त्यो आपला जन्मदाता !...घोर कलियुग आलंय ! आज मुलं मायबापांना इचारीनात तर त्या देवाला कशाला आठवत बसतील !'

बापू बोलत राहिले. सदानंदची हालत शीलासारखीच झाली.

बापूना भेटायची हिंमत त्याला झाली नाही. 'उद्या सकाळी बापूला एकटा गाठावा' ...म्हणून परतले.

कीर्तन संपल्यावर बापू झोपायला गेले. झोप येईना ! डोक्यातील विचार भंडावू लागले. 'इथं आलो तं सवाला भेटल पाहिजे ! कित्तीही झालं तरी त्यो आपला ल्योक ! पोर ..एकदा साऱ्यांना पहावं... डोळे भरून...चितू...पितू...शीला...कशी दिसतील ? आपला हा वेष...कसं जावं ? त्याला तर ह्या...साऱ्याची लाज वाटते... म्हनला तं म्हनला ! काय व्हतं !...माजं आता वय झालं...'

बापू रात्रभर विचार करीत राहिले.. अन् ..सकाळी पाचच्या दरम्यान अचानक त्यांच्या छातीत कळ उठली. बापू सांगताहेत ...माणसं जमताहेत...तोवर ती कळ बापूच्या बरोबरच सपली !

सदानंदाला बऱ्याच उशीरा कळलं. घरी एकच आकांत झाला ते घडपडत आले, तोवर लोकानी सगळी तयारी केली होती. दोघांचं रक्ताचं नातं; पण...दैवगती !

...त्या साऱ्या मिरवणुकीत ते चालत होते...एक नगण्य माणूस म्हणून...

सदानंद भानावर आला तेव्हा त्याला जाणवलं की ते गावाच्या बाहेर आले आहेत. श्रद्धाळू माणसं पालखीला खांदा देत होती. त्याला वाटल, निदान खादा तरी द्यावा...पण ...एकानं त्याला ढकलून स्वत.च खादा दिला !


स्मशानभूमीत ते सर्व पोहोचले तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. ऊन रणरणत होतं.

भजनीमंडळी गात होती, 'इस तन धन की कोन बडाई । देखत नैन मे मिट्टी मिलायी ।'

चिता रचली. अग्नी दिला. धडाडून पेटली. लोकांनी गर्जना केली, 'बापू, अमर है ।'

सारे घराकडे परतले.

एकटा सदानंद बसला चितेकडे बघत ! अगदी पोरका झाला' भावनाचा बंध फुटला. अश्रू वाहू लागले. अनावर हाक कंठातून बाहेर पडली, 'बापू !'




लेखांक पहिला

□

लेखकाच्या
मध्यपूर्वेतील
मनमुराद
भटकंतीवर
व
इराणमधील वास्तव्यावर
आधारलेली
नवी लेखमाला

२७ जुलै १९८० रोजी इरणचा पदच्युत शहेनशाह मोहम्मद रेझा आर्यमिहर पहेलवी पैगंबरवासी झाला. हा माणूस धर्मांध बादशहा किंवा वेडा डिक्टेटर नव्हता. त्याला एकच जिद्द होती, एकच महत्त्वाकांक्षा होती– आपला देश पाश्चिमात्यांपेक्षा आधुनिक आणि विकसित बनविण्याची. वेड असलंच तर ते प्रगतीचं होतं. त्यासाठी त्यानं जुलुम–जबरदस्ती करण्यास मागं–पुढं पाहिलं नाही. आपल्या देशाच्या प्राचीन संस्कृतीचा त्याला जबरदस्त अभिमान होता आणि आधुनिक विज्ञानाच्या सहाय्यानं देशामध्ये विसाव्या शतकातील एक महान संस्कृती निर्माण करण्याचं तो स्वप्न पहात होता; पण त्याच्या देशाला प्रगतीचा वेग सहन झाला नाही.

१९७०·७१च्या सुमारास शहनशहानं इराणच्या दोन हजार पाचशे वर्षांच्या साम्राज्याचा प्रचंड सोहळा आयोजित केला. जगातील सर्व देशांचे पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष, मंत्री आणि प्रतिष्ठित लोक सोहळा पहाण्यास आले. त्यांपैकी अनेकांना इराण आणि पर्शिया हे दोन वेगवेगळे देश असावेत असं देखील वाटत होतं. काहीजण इराण मध्यपूर्वेत अरबस्थानात आहे असं देखील समजत होते. इराण हे आशियामध्ये आहे आणि इराणी लोक अरब नसून आर्यन आहेत हे देखील अनेकांना प्रथमच उमगत होतं.

सोहळ्याच्या सुरुवातीला शहनशहानं कुरुप–ए–कबीर (सायरस द ग्रेट ) ह्याच्या समाधीसमोर शपथ घेतली. शपथ अल्लाच्या नावानं नाही तर– झोराष्ट्रियन दैवी शक्ती अहूरामझदाच्या नावानं. ह्या मुसलमान शहनशहानं शपथ घेताना कुरुष–ए–कबीरच्या आत्म्याला उद्देशून म्हटलं होतं :

‘ हे राजाधिराज महाराजा शाह–ए--बुजूर्ग–इराणच्या शहनशहा, मी, मोहम्मद रेझा पहलवी तुला आश्वासन देतो की, तू स्थापन केलेलं हे साम्राज्य मी भरभराटीला नेण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. अहूरा–मझदाच्या साक्षीनं मी तुला वचन देतो की, इराणी प्रजेच्या कल्याणासाठी मी माझं सर्वस्व अर्पण करीन ! – ’

मी हा सोहळा प्रत्यक्ष पाहिला नाही; पण त्याची रंगीत फिल्म पाहिली आहे. शहनशहाचे हे शब्द अजूनही माझ्या कानात घुमतात. ह्या शहानं एका पुस्तकाची प्रस्तावना लिहिताना १९७१ साली जे लिहिलं त्याला आज अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होतं. मोहम्मद रेझा पहेलवीनं लिहिलं होतं–

‘ अडीच हजार वर्षांपूर्वी कुरुप – ए – कबीर नंतर सम्राटपदी आलेल्या शहनशहा दारियुप (दरायस) ह्यानं भविष्यातील सम्राटांना उपदेश केला होता – माझ्यानंतर ह्या साम्राज्याकडे सम्राटपद भूषविणाऱ्या राजा– जर हे साम्राज्य टिकावं, त्याची भरभराट व्हावी अशी तुझी इच्छा असेल तर असत्याचा त्याग कर. असत्य वचनी

माणसाला कडक शासन कर. दया, कृपा, न्याय आणि परोपकार ह्याच्या आधारे सहनशील वृत्तीनं राज्यकारभार चालव ' दारियुष-नंतरच्या अडीच हजार वर्षांच्या काळात ह्या देशावर अनेक संकटं आली. परमेश्वरकृपेनं दरवेळी देश त्या संकटातून सहीसलामत तारला गेला, आज इराण एक स्वाभिमानी आणि स्वतंत्र प्रगतिशील राष्ट्र म्हणून नावारूपास येत आहे. आज, पाश्चिमात्य देशातील सर्व-सामान्य माणसास जागतिक शांतीच्या दृष्टीनं इराणचं राजकीय आणि भौगोलिक महत्त्व कदाचित माहीत नसेल. जगाच्या नकाशा-कडे दृष्टिक्षेप टाकला तर लगेच ध्यानात येईल की, इराण हे संपूर्ण मध्यपूर्व, पाकिस्तान, अफगाणिस्तान, हिंदुस्थान आणि आफ्रिका ह्यांचं महाद्वार आहे. इराणमधील राजकीय परिस्थितीवर ह्या सर्व देशातील शांती अवलंबून आहे. इराणवर ही एक फार मोठी नैतिक जबाबदारी आहे आणि इराणला त्याची पुरेपूर जाणीव आहे. प्राचीन इतिहास आणि महान सस्कृतीची सदैव जाणीव असणारे इराणी नागरिक अनेक संकटांना तोंड देऊन स्वातंत्र्य टिकवून आहेत. कदाचित दुसऱ्या कुठल्याच देशावर इराणइतकी परकीय सत्तेची आक्रमणं झाली नसतील. इराणनं अनेक प्रकारच्या हमल्यांना तोंड दिलं. अनेक वेळा इराण उध्वस्त झाला; पण संकटकाळ संपताच पुन्हा हा देश नव्या जोमानं उभा राहिला. अडीच हजार वर्षांच्या इति-हासात स्वातंत्र्य –गुलामगिरी, सुबत्ता-उपासमारी हा अंधारप्रकाशाचा खेळ इराणनं अनेक वेळा अनुभवला. इराणमध्ये एक प्रसिद्ध लोक-कथा आहे. सीमुर्ग (फिनिक्स्) ह्या पक्ष्याची. संकटसमयी हा अमर-पक्षी स्वतःच्या पिसाची चिता पेटवून त्यावर आत्मदहन करतो आणि त्याच राखेतून पुन्हा प्रचंड ताकद घेऊन जन्माला येतो आणि संकटाचा पाडाव करतो. इराण त्या फिनिक्स पक्ष्यासारखा आहे–'

१९७१ साली लिहिलेली शहनशहा मोहम्मद रेझा पहलवीची ही वाक्ये आज अभ्यासण्यासारखी आहेत. शहनशहाच्या मृत्यूची बातमी ऐकून मला अतिशय वाईट वाटलं. मला ह्या शहनशहाबद्दल आदर आहे. त्याच्या देशात मी पाच वर्षे मनमुराद भटकलो आहे. इराणी आदरातिथ्यानं वारवार भारावून गेलो आहे. ह्या राजाला मी जव-ळून पाहिलं आहे. त्याच्या बाजूला पाहिलं आहे. तिच्यावर फिल्म-देखील केली आहे.

हा शहनशहा सर्वसाधारणपणे दर तीन महिन्यांतून एकदा पत्रकार परिषद बोलवायचा. प्रश्नोत्तरं दूरचित्रवाणीद्वारा देशभर दाखवली जायची. देशी–विदेशी पत्रकारांना मनमोकळी आणि ठोस उत्तरं देताना त्याचा स्वाभिमान, आपल्या देशाबद्दलचं प्रेम वारंवार त्याच्या चेहऱ्यावर प्रकट होत असे. कुणी काही म्हणो, हा शहनशहा खोटा नव्हता. देशाला आधुनिक बनविण्याची त्याची तळमळ खोटी नव्हती. १९७४ च्या नव्हेंबर महिन्यातील, नियावरान महालातील त्याची पत्रकार परिषद मी पाहिली होती. अत्यंत उमद्या व्यक्तिमत्वाचा हा सम्राट प्रश्नांना सडेतोड उत्तरं देत होता. तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यापासून युरोप आणि अमेरिकेत खळबळ माजली होती. प्रश्नोत्तराचा रोख त्या विषयावर होता–

प्रश्न : महाराज, पाश्चिमात्य जगातील कारखानदारीला तेलाच्या किंमतीची वाढ झाल्यामुळे जबरदस्त आर्थिक तोटा येणार आहे. औद्योगिक संस्कृतीवर आधारित पाश्चिमात्य राष्ट्रांनी प्रत्युत्तरादाखल काही सैनिकी कारवाई करण्याचं ठरवलं तर ?

उत्तर : तेलाच्या किमती आम्ही वाढविल्या म्हणून आमच्यावर हे देश 'मिलटरी अॅक्शन्' घेण्याची नजदिकच्या भविष्यात तरी शक्यता नाही. कुणाकुणावर हे देश संगिनी उगारणार ? व्हेनेझुअेलावर देखील सैनिकी आक्रमण करणार का ? कोण करणार ? अमेरिका हे युद्ध पुकारणार ? व्हेनेझुअेला, मेक्सिको सौदी अरेबिया, इराण आणि इतर 'ऑपेक' देशावर सैनिकी आक्रमण करण्याइतकी ताकद अमेरिकेकडे खरच आहे काय ? तितकं त्यांच्यात धाडस आहे काय ? युरोप आणि अमेरिका एकत्र येऊन हे धाडस करतील असं तुम्हाला वाटतं काय ? हे जर झालं तर कम्युनिस्ट गप बसून राहतील अस तुम्हाला वाटतं काय ? रशिया थंड बसेल काय ?–आम्ही तेलाच्या किमती वाढवल्या म्हणून आम्हाला धडा शिकविण्यासाठी सैन्यबळाचा उपयोग केला जाईल असं मला वाटत नाही. हा प्रश्न केवळ शांततापूर्वक वाटाघाटीनीच सोडवता येईल—आणि तसा तो सोडवला जावा अशी माझी विनंती आहे.

असा हा मनस्वी राजा. त्याचं स्वप्न मात्र अपुरं राहिलं. त्यानं सतत देशाला पाश्चिमात्यांच्या धर्तीवर विकसित करण्याची अतोनात धडपड केली. विकासासाठी त्यानं पाश्चिमात्य 'मॉडेल' डोळ्या-समोर ठेवलं–आणि हीच त्याची भयंकर मोठी चूक ठरली. ज्या विकासयोजना पूर्ण होण्यासाठी कमीत कमी वीस-पंचवीस वर्षं लागली असती त्या योजना चार-पाच वर्षांच्या आत पार पाडण्याची त्याला घाई झाली होती. त्याचा हा तुफानी वेग इराणी सस्कृतीला मान-वला नाही. अहुरा मझदाच्या नावे शपथ घेणाऱ्या ह्या इस्लामिक शहनशहाला हे तेव्हा कसं जाणवलं नाही ह्याचं राहून राहून आश्चर्य वाटतं ! अप्रतिम देखण्या सोरायाच्या वेळी हा राजा केवळ एक 'खुशालचंद' म्हणून प्रसिद्ध होता. सोरायाला तलाक देऊन–नंतर जेव्हा फाराहबरोबर त्यानं लग्न केलं तेव्हापासून तो बदलला. दिवसाचे अठरा-अठरा तास खपून त्यानं देशबांधणीचं काम हाती घेतलं. त्यानं जे काही केलं ते चूक का बरोबर हे काळच ठरवील ! आज 'खबरनामा'ची सुरुवात करताना इराणच्या ह्या शहनशहाची जबरदस्त आठवण झाली आणि मन भूतकाळात वावरू लागलं–
☐

आठवणी अजूनही स्पष्ट आहेत. अस्पष्ट होण्याइतकं माझं वय झालेलं नाही; पण आठवणीच इतक्या आहेत की साऱ्याच सुस्पष्ट रहाणं तसं पहाता जरा कठीणच.

सुदैवानं आठवणीच्या फाइलीला जी कार्बन कॉपी लावली–कॉपी, कारण ओरिजिनल म्हणजे अनुभव, तो तत्क्षणी मिळणारा, फाइल करता न येणारा–तर कॉपी करताना वापरलेला कार्बन देखील सुदैवानं उत्तम प्रतीचा निघाला. कॉपीवर जे उमटलं ते अगदी ठस-ठशीत आणि कॉपीज् जिच्यात ठेवल्या ती फाइलदेखील मजबूत निघाली. अजून तरी वाळवी लागली नाही !

एक अडचण मात्र आहे. फाइलला अजिबात सिस्टिम नाही. तिथं बराचसा गोंधळ आहे ही फाइल आता संगतवार लावणं जरा अवघडच आहे.

आता ह्या फाइलमध्ये कसच्या एव्हढ्या आठवणी आहेत ? अर्थातच अनुभवाच्या ! टाइमटेबल आखून अनुभव घेणं कधीच

जमलं नाही. अनेकांना ते जमतं. त्यांनी आपल्या साऱ्या आयुष्याचंच टाइमटेबल आखलेलं असतं. मला तसलं जमणं अशक्य. माझी वृत्ती बेबंद आहे. अनुभव येत राहिले—मी घेत राहिलो.

आयुष्याची दिशा वगैरे आखून, त्या दिशेला योग्य रीतीने पावलं टाकता यावीत म्हणून मार्गदर्शन करणारे अनुभव शोधण्याचा मी खटाटोप केला नाही. अनुभव जसे येत गेले तसतशी दिशा ठरत गेली. कधी पूर्व—कधी पश्चिम; उत्तर किंवा दक्षिण; कधी अधली—मधली—आग्नेय किंवा वायव्य अशी. समोरची वाटच चालत राहिली —मी अनुभवावर स्वार होऊन ती नेईल तिथं जात राहिलो. ही वाट उत्तुंग पर्वतांच्या छाताडावरून फिरली, कधी घनदाट जंगलातून —कधी वैराण वाळवंटातून—तर कधी दलदलीतून आणि माणसांच्या गर्दीतून.

रस्ता चुकण्याचा, दिशा हरवण्याचा प्रश्नच नव्हता. दिशेच्या शोधातच नव्हतो आणि नाही मग हरविण्याचा प्रश्न येणारच कुठून !

बरं ही पुढं पुढं चालणारी वाट तशी स्पेशल वगैरे अजिबात नाही. Path of Least resistance ..कमीत कमी अडथळे, प्रतिबंध आणि रुकावट असलेली वाट पाणी ज्याप्रमाणं जातं—वहातं त्याप्रमाणं. पाणी निसर्गाचे नियम सोडून, नियम मोडून—निसर्गाच्या विरुद्ध जात नाही. आयुष्यही निसर्गनियमाना धरून मोकळं सोडलं तर ? बिकट वाट वहिवाट नसावी—धोपटमार्गा सोडु नको—

माझे वडील नेहमी म्हणायचे, 'अरे, ह्या फटक्याचा अर्थच समजला नाही. अर्थाचा आम्ही विपर्यास केलाय आणि धोपटमार्ग म्हणून स्वनिर्मित अडथळ्याना ठेचकाळत आम्ही बोंब मारत बसलोय. आम्हाला वाटतंय ज्याला आम्ही धोपटमार्ग म्हणतो त्यातच पदोपदी इतके अडथळे आहेत मग बिकट वाटेच्या नादी मरायला कशाला लागा ! आम्ही ज्याला धोपटमार्ग म्हणतोय ती खरं म्हणजे बिकट वाट त्या वाटेची वहिवाट नको आणि फटक्यामध्ये जो धोपट मार्ग सांगितलाय तो म्हणजे पाण्याप्रमाणे—कमीत कमी अडथळ्यांचा—निसर्गनियमाप्रमाणे जाणारा मार्ग !

वडील मला म्हणायचे, जे घडतंय त्याला सामोरा जा. वळणं वेडीवाकडी असतील. बघूनच तुझी छाती फुटेल; पण अजिबात डरू नको! ही वळणं चुकवायचा प्रयत्न केलास तर फसशील, पस्तावशील! वळणं पार करून तर बघ मग तुला समजेल की आपली भीती, चिंता अनाठायी होती. एखाद्या वेळी अगदी कड्यावरून झेप घेण्याची वेळ येईल, कचरू नकोस! धबधबा पाहिला आहेस ना— कडा पार केला की पुढची वाट तर आणखी सुकर. ज्याला तू कपाळमोक्ष मानतोस त्यातून शक्ती मिळेल. कड्यावरून झेपावलं मात्र पाहिजे—तो-धोपट मार्ग ! कडा चुकवायचा प्रयत्न केलास की बिकट वाट सुरू झाली—वाहात रहायचं-पाण्यासारखं. जे कठीण आहे, जे अवघड आहे असं वाटतं तेच पहाता पहाता सोपं होऊन जातं!

तेविसाव्या वर्षी खांद्यावर कॅमेरा घेऊन जो बाहेर पडलो तो पंधरा वर्षं मनमुराद भटकून अडतिसाव्या वर्षी पुण्याला येऊन काहीसा स्थिरावलो. भटकंती मात्र चालूच आहे. जिप्सी.

एस्‌एस्‌सीपर्यंत तेरा शाळा. अर्धं शिक्षण कानडीत, अर्धं मराठीत त्यानंतर बी. एस्. सी. नापास होईपर्यंत नऊ कॉलेजिस झाली. दोनदा युनिव्हर्सिटी बदलली! अभ्यासापेक्षा अथलेटिक्स, टेबलटेनिस, बॅडमिंटन्, क्रिकेट् आणि नाटकं करणं आणि बसविणं ह्यातच आला दिवस जायचा. मग पुण्याला फिल्म इन्स्टिटयूट निघाली. तिथं गेलो. तीन वर्षांचा चलत्‌चित्रणाचा कोर्स. मी दोन पूर्ण केली. जर्मन टेलिव्हिजनचं बोलावणं आलं. कोर्स सोडला आणि आशिया भटकू लागलो. जर्मन टिव्हीसाठी अनेक फिल्मस् केल्या. दलाई लामा, पंडित नेहरू, लाल बहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, चामराज वडियार, सत्यजित रे, सुकार्नो, सिहानुक, थायलंडचा राजा भूमीबोल अडुलदेज्—अशा अनेक व्यक्तींना जवळून पाहिलं. त्यांच्या जीवनावर फिल्मस् केल्या. भारत-पाक युध्द, व्हिएटनामचं युध्द— दंगली, जाळपोळी, सर्व सर्व कॅमेऱ्यानं टिपलं. बंगालचा जेमिनी राय, बालीचा स्नेल् वगैरे कलाकारांच्यावर जीवनपट बनविले. बडा मजा आला !

¤

एअर फ्रान्सची फ्लाइट लेट झाली होती. एअरपोर्टच्या बार-समोरील उंच स्टुलावर बसून मी गर्दी न्याहाळत होतो. जपान एअरलाइन्सचं विमान देखील उशिरा येणार होतं. एअरपोर्टच्या लाउंजमध्ये कटाळा भरून राहिला होता. सर्व प्रवाशांच्या चेहऱ्यांवर एक विचित्र प्रकारची पेंगुळलेली अवकळा पसरली होती. बसून बसून अवघडलेले प्रवासी शीण घालविण्यासाठी उगाचच इकडे तिकडे कटलेल्या पतंगाप्रमाणे घुटमळत होते. दहा दिवसांत जगप्रवास उरकण्याच्या उत्साहानं निघालेले म्हातारे अमेरिकन टूरिस्ट विमान उशीरा आल्यामुळं पुढील कार्यक्रमात गोंधळ होणार म्हणून काहीसं सचिंत झाले होते.

बार-स्टूलवर व्हिस्कीचे घुटके घेत मी थड बसून होतो. आठ पासपोर्टस्‌ची पानं भरून प्रवास झालेला. ह्या बँकॉक विमानतळावरून तर मी पन्नास वेळा वरखाली केलं असेल. विमानं क्वचितच वेळेवर येतात किंवा सुटतात. पहिल्या-पहिल्यादा अस्वस्थ वाटायचं; पण नंतर ते सर्व अंगवळणी पडलं.

पहिली काही वर्षं विमानात खिडकीची सीट मिळाली की परमानंद व्हायचा. रात्रीचा प्रवास असला तरी खिडकीच्या काचेला नाक लावून मी बाहेरचा अंधार तासनतास पहात रहायचा. दिवसाचा प्रवास असला तर मात्र मला अजूनही खिडकीची सीट आवडते.

एअर फ्रान्सचं विमान भलतंच लेट झालं होतं. मी तेहरानला निघालो होतो. पहिला दौरा. इराणबद्दल मनात प्रचंड कुतूहल होतं. विमानाची वाट पहात असताना विचार मात्र सरोजाचे—बायकोचे घोळत होते. ती बँकॉक सोडून कोसबालला रहायला गेली होती. जवळजवळ सहा महिने उलटले होते. मी ब्रह्मचारी ! बँकॉकमधे ब्रह्मचर्य पाळणं म्हणज असिधाराव्रतापेक्षा कठीण !

फ्लाइट बँकॉक – बाँबे – तेहरान अशी होती. मुंबईत फक्त पंचेचाळीस मिनिटांचा 'थांबा !' ट्रान्झिट्‌मधील प्रवाशाला बाहेरील मंडळींची गाठभेट घेता येत नाही. म्हणून सरोजाला मी कळवलं नव्हतं. मी मंबईत पंचेचाळीस मिनिट असणार तेव्हा सरोजा कोसबाडला. फक्त नव्वद किलोमीटर अंतरावर !

—इराणमधील महिनाभराचं काम संपवून बँकॉकला परतण्याच्या वेळी मात्र मी मुंबईत दोन दिवस राहणार होतो.

—शेवटी एकदा एअर फ्रान्सचं विमान आलं. अजगराप्रमाण सुस्तावलेली लाउंज एकाएकी नागिणीप्रमाणे सळसळू लागली. कर्मचारी,

प्रवासी, सेक्युरिटीचे अधिकारी–सर्वांच्या हालचालीना वेग आला. प्रवाशांना विमानापाशी नेण्यासाठी एक भलीमोठी बस दाराशी येऊन थाबली आणि काही क्षणातच आम्ही प्रवासी जंबोजेटच्या अजस्र पोटात शिरलो.

एकोणिसशेबहात्तर सालची ही गोष्ट. त्यापूर्वी मी अनेक वेळा अफगाणिस्तानला गेलो होतो. हिंदुकुश ओलांडला होता. खैबरखिंड पाहिली होती; पण त्याही पल्याड जाण्याची ही पहिलीच वेळ !

इराण म्हटलं की डोळ्यांसमोर पुण्यातील गुडलक किंवा लकी रेस्टॉरंटचे मालक, मुंबईमधील चायवाले आणि डहाणूच्या परिसरातील चिक्कूच्या वाड्यांचे आणि गुलाबाच्या मळ्याचे धनाढ्य बागायतदार यायचे. मी बारा–तेरा वर्षांचा असताना सांगलीजवळील माधवनगर ह्या गावी रहात असे. त्या वेळी माधवनगर स्टेशनजवळ इराणी लोकांचा एक तांडा उतरला होता. वास्तविक ही मंडळी बलुची (हे अर्थातच नंतर कळलं) तेव्हा मात्र कात्र्या आणि चाकूसुऱ्या विकणाऱ्या ह्या फिरस्त्यांना आम्ही ' इराणी लोक ' असंच म्हणायचो माधवनगरमधील तरुण बाप्येमंडळी संध्याकाळच्या सुमारास तांड्याच्या राहुटयाच्या अवतीभवती घुटमळत रहायची. मिशाळ तगडे बापे–धारदार नाकाच्या गोऱ्यापान लालबुंद गालाच्या बाया–बाहुलीसारखी दिसणारी पोरं ! मी देखील तांड्याचा आसपासच फिरत रहायचो.

एक दिवस माधवनगरमधील आमचा शिंपी रस्त्यात भेटला. स्वारी खुशीत दिसत होती. हर्कूशेठच्या दुकानात त्यानं मला एक प्लेट गरम गरम भजी खाऊ घातली आणि म्हणाला, ' संध्याकाळी दुकानावर या–गंमत बघायला मिळेल !'

मी गेलो. दुकानाबाहेर माधवनगरवासियांची गर्दी. वाट काढून मी दुकानात शिरलो. शिंप्याच्यासमोर सात–आठ ' इराणी ' बाया उभ्या होत्या. त्यांना झगे शिवून घ्यायचे होते. शिंपी टेपनं त्यांच्या छातीची, पाठीची, खांद्याची, दंडाची, कमरेची मापं घेत होता. दुकानाबाहेरची गर्दी 'नाम्या चांगला चान्स हाय–पुन्हा असली पर्वणी मिळायची न्हाई !' वगैरे बोलून खिदळत होती. मी कंटाळून परतलो.

दुसऱ्या दिवशी शिंप्याची गाठ पडली तेव्हा त्याला झापला–' गंमत बघायला बोलावलंस; पण नुसती मापंच घेत बसलास ! गंमत कुठं होती ?' कपाळावर हात मारून घेत शिंपी म्हणाला, 'अहो, तीच तर खरी गंमत ! आज वीस वर्सं बायांची कापडं शिवतोय; पण असं अंगावर माप घेण्याचा चान्स कधीच मिळाला नव्हता ! काय एकीकीच्या छात्या नुसतं माप घेऊनच घाम फुटला—'

—एअर फ्रान्सची हवाईसुंदरी ठराविक साच्याचं कृत्रिम हास्य करून माझ्यासमोर रात्रीच्या जेवणाची थाळी ठेवत होती. माधवनगरच्या आठवणीतून मी पस्तीस हजार फुटांवरून उडणाऱ्या जंबोजेटच्या वातावरणात परतलो. समोरचं अन्न काटया–चमच्यांनी चिवडलं आणि कॉफी पिऊन झोपी गेलो.

¤

पस्तीस हजार फुटांवरून उडणारं एअरफ्रान्सचं जंबोजेट भारताची सीमा पार करताना अशा प्रदेशावरून उडत होतं की ज्यांचा इतिहास, चंद्रावर पाय ठेवण्याची क्षमता असणाऱ्या विसाव्या शतकातील आधुनिक मानवाला अजूनही कोड्यात टाकत होता. संस्कृतीचा थांगपत्ता लागणं तर दूरच !

पर्वतसम्राट हिमालय आणि त्याचा शेजारी काराकोरम इथं कुठं तरी दगडाला पाझर फुटला. हिमदगडाचा पाझर–त्यातून नदीचा उगम झाला. ती वाहू लागली. तिला आणखी चार पाझर मिळाले. पंज आब, पाच पाण्यांचा समृद्ध प्रदेश निर्माण झाला !

हिमालय आणि काराकोरमच्या कुशीत जी नदी जन्मली तिच्या पलीकडच्या तीरावरील रानटी टोळ्यांना आणि बलाढ्य सम्राटांना तिनं वेड लावलं. तिच्या अल्याडच्या काठावर काय आहे हे पाहण्याचं जबरदस्त आकर्षण पल्याडच्या जमातीत निर्माण झालं.

साधक, संशोधक, व्यापारी, विद्यार्थी, सम्राट ही नदी पार करण्याचं स्वप्न जोपासू लागले. ह्या नदीचं असं वैशिष्ट्य तरी काय होतं ? अजूनही कुणाला ते उमगलं नाही. ह्या सिंधूनदीनं समृद्धाबरोबरच अनेक न सुटणाऱ्या कोड्यांना जन्म दिला.

हिमदगडाला पाझर फुटला की प्रथम जन्माला येतो एक थेंब. त्या थेंबाला मग ओढ लागते सागरात विलीन होण्याची. त्याची ही ओढ पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या थेंबाला जाणवते. तो देखील हिमदगडाचं काळीज फाडून पहिल्या थेंबात मिसळतो. थेंब थेंब ठिबकणाऱ्या पाझराचा निर्झर होतो.

आसपासच्या इतर हिमदगडांना ही वार्ता कळते. त्यांच्या काळजाचा थरकाप होतो. संधीचा फायदा घेऊन त्यांच्या उरात साचलेलं पाणी थेंब थेंब वाहू लागतं.

मूळ निर्झराला अनेक छोटेमोठे प्रवाह येऊन भिडतात. प्रत्येक झरा आडवळणाची पण सोपी वाट काढून निघालेला असतो. हे असंख्य छोटाले निर्झर मूळ झऱ्याला मिळतात तेव्हा त्यानी असंख्य आडवाटा पार केलेल्या असतात. त्यातूनच नदी आकार घेते.

त्या नदीच्या आसपास असेही काही निर्झर असतात की सोपी वाट उगाचच अवघड करून अडथळ्यावर आपटत रहातात. बरेचसे निर्झर क्षणकाळ जगून वाफाळतात, नष्ट होतात. धुक्यातून सूर्याकडे तक्रार नोंदविण्यासाठी धावतात. वाट चुकलेले, ठेचकाळलेले काही निर्झर एकत्र येतात, स्थिरावतात. सरोवरासारखे ध्यानस्थ बसतात. खूप विचार करतात. मग गुप्तपणे हळूच धरणीच्या उदरात शिरून नदीला मिळतात. सरोवर मात्र शांत शांत. ना भरती ना ओहोटी.

मूळ नदी वाहातच असते. ज्या थेंबांची वाफही होत नाही किंवा सरोवराची गाठ पडत नाही त्यांचे निर्झर काही काळ बंड करून उपनद्या होतात आणि मग मूळ नदीला भिडतात. संगम होतो.

मूळ नदी वाहात असते. संगम झाला की दो-आब बनते, तीन झाल्या की त्रिवेणी– आणि मग त्यातून पंजाब जन्माला येतो. मूळ नदीशी चार नद्यांचा संगम –झेलम, चिनाब, रावी आणि सतलज, पंजाबचा अर्थ समजतो; पण सप्तसिंधू म्हणजे काय ? पुन्हा कोडे ?

एअरफ्रान्सचे जंबोजेट पस्तीस हजार फुटांवरून उडत असते. खाली हा कोडी घालणारा प्रदेश.

सिंधू म्हणजे ' इंडस् '. त्यापून हिंदू शब्दाचा जन्म. मग हिंदुस्थान किंवा इंडिया; पण इंडिया दॅट इज भारत हे कोडं काय ?

'इडस्' पल्याडच्या प्रत्येकाला ही नदी पार करण्याचं वेड लागलं आणि अजूनही आहे हे तर सत्य. अगदी सात-आठ हजार वर्षांपूर्वीपासून माकडाच्या वंशजाला सिंधू पार करण्याचा ध्यास लागला. सिंधू ओलांडली की संपूर्ण अनुभव घेतला, सिंधूपल्याड स्वारी केली की जग जिंकलं असं त्यांना वाटायचं; पण ऐलतीरावरच्या लोकाचं काय? ऐलतीर किंवा पैलतीर हे तुम्ही कुठल्या काठावर उभे आहात त्यावर अवलंबून आणि त्यावावतच प्राचीन काळापासून ह्या प्रदेशात प्रचंड गोंधळ माजलेला आहे.

बँकॉक येथे एखाद्या कॉकटेलपार्टीमध्ये भेटलेला नवखा मला विचारायचा, 'तुमचं शिक्षण कुठं झालं?' मी म्हणायचो 'वेस्ट— पश्चिमेकडे!' मग तो विचारायचा, 'ऑक्सफर्ड का केंब्रिज?' जणू काही जगामध्ये ह्याच दोन जागा आहेत शिक्षणासाठी! मी म्हणायचो— 'अथणी आणि बैलहोंगल!' तो चक्रावून जायचा त्याला ह्या जागा कुठं आहेत कळायचं नाही मी त्याला नकाशात पहायला सांगायचो.

खरच आहे— बँकॉक म्हणजे थायलंड आणि त्याच्या पश्चिमेलाच अथणी आणि बैलहोंगल आहे आपल्या कर्नाटकात; पण सर्वसाधारणपणे पश्चिम म्हणजे 'पाश्चिमात्य' म्हणजेच आधुनिक, सांस्कृतिक, उच्च औद्योगिक — युरोप,-अमेरिका हेच सर्वांच्या मनात येतं ऐलतीर—पैलतीर कळत नाही म्हणून गोंधळ उडतो.

आता 'फार ईस्ट' हा शब्द घ्या. दूरवरची पूर्वदिशा. तसं पाहिलं तर निरर्थक शब्द, कुणाला दूरवर? पण ह्याचा विचार न करता आपल्या डोळ्यासमोर एकदम कोरिया किंवा जपान हेच देश येतात ना? आता 'फार' म्हणजे लांब— म्हणजे अनोळखी म्हणजेच अविकसित वगैरे ओघानं आलं; पण लांबचं काय हे ठरविण्यासाठी केंद्रबिंदू कोणता मानला गेला आहे हे पहाणे आवश्यक आहे.

नकाशावर ठिपक्याप्रमाणे असणाऱ्या एका बेटावरील अवर्ण जमातीनं काही काळ पृथ्वीतलावर धुमाकूळ घातला हे मान्य; पण त्यांच्या केवळ शे-दोनशे वर्षांच्या संपर्कानंतर अल्याडचे—ऐलतीरावरचे—लोक जर मूळ विचारसरणी हरवून बसले तर काय म्हणायचं?

ग्रीकोरोमन संस्कृती आणि त्यातून जन्माला आलेलं 'ब्रिटन' हे जर जगाचा केंद्रबिंदू मानलं तर मग सर्वच 'दूर' आहे. जपान पूर्वेपासून जितकं दूर आहे तितकंच ब्रिटन देखील आहे; पण ब्रिटिश व्यापाऱ्याला जपान हे पूर्वेकडे दूरवर आहे असं वाटलं. त्यातून नाव पडलं 'फार ईस्ट.' आज आता बालवाडीतील लेकराला देखील पृथ्वी गोल आहे हे पटलं आहे. सर्वांनाच सर्व दिशा सारख्याच दूर आहेत हा एक साधासा सिद्धांत आपण केव्हा मानणार? शब्दांची पोपटपंची करणाऱ्यांनी ह्यावर विचार करण्याची मात्र आता वेळ आली आहे.

रूडयार्ड किपलिंग— एक महाखोटारडा लेखक. वेस्ट इज् वेस्ट, ईस्ट इज ईस्ट, द ट्वेन कॅन नेव्हर मीट— त्याच्या गाजलेल्या ओळी; पण अर्थ काय? 'ते' श्रेष्ठ 'आम्ही' कनिष्ठ असा अर्थ करायचा का? पण 'ते' कोण आणि 'आम्ही' कोण?

नदी मात्र वाहातच असते. उपनद्यांची ती वाट पहात नाही. आधुनिक तंत्रज्ञानानं तिला बंधारा घातला, धरण घातलं तरी ती वाहातच असते. जुलुमजबरदस्तीनं तिचा प्रवाह रोखण्याचा चुकीचा प्रयत्न केला तर ती धरण फोडून वाहाते.

आपण मग सैरावैरा धावतो. जीवाच्या आकांतानं ओरडतो— पूर आला, पूर आला— धरण फुटलं— पाणी घुसलं! सर्वत्र मग हाहा:कार माजतो. त्यातून जीवितहानी होते. स्थावरजंगम धुऊन निघतं.

पण चूक नदीची नाही. वाहत्या पाण्याला अडथळा मान्य नाही. वाहणारं पाणी नेहमी कमीत कमी अडथळ्याचाच मार्ग स्वीकारतं. संस्कृतीचं तसच आहे, संस्कृती म्हणजेच निसर्गनियमानं आकाराला आलेली नित्य बदलणारी वस्तुस्थिती.

कृत्रिम अडथळे आले की प्रवाह वक्र होतो. कृत्रिम अडथळ्यामुळं गाळ साचत जातो. गाळ अनुभवसमृद्ध. कृत्रिम अडथळे मग त्याखाली गाडले जातात आणि नदीला महापूर येतो.

हे कृत्रिम अडथळे जेव्हा गाळाखाली गाडले जातात तेव्हा आपण ऊर बडवून आक्रोश करतो—एक महान संस्कृती लोप पावली! आमच्या लक्षातच येत नाही की लोप पावलय ते महान नसून ज्या अनुभवसमृद्ध गाळानं ते गाडलंय तो गाळ महान आहे. ज्या ऐतिहासिक वस्तुस्थितीला आपण महान संस्कृती असं मानत असू ती कदाचित संस्कृतीच्या प्रवाहातील एक कृत्रिम अडथळा असण्याची शक्यताच जास्त आहे. नदीच्या सहज आणि निसर्गनियमानुसार जाणाऱ्या प्रवाहाला हा अडथळा मान्य नसेल!

मूळ नदीच्या वाहत्या पाण्याची ताकद प्रचंड आहे. उगमाला रेशमी धाग्यासारखा दिसणारा हा प्रवाह इतर अनेक जलधागे गुंफत जेव्हा एखाद्या उन्मत्त पहाडाच्या छाताडावरून पुढे निघतो तेव्हा पहाडाची छाती फाटते. पहाड दुभंगतो. मूळ नदी वाहत रहाते आणि मग निर्माण होते दरी.

दोन्ही बाजूना तुटलेलेले, फाटले कडे. गगनाला भिडणारे. त्या तुटलेल्या कड्यांना पाहून, त्यांच्या अकाळ—विक्राळ दर्शनानं आपण भारावून जातो. पहाड फोडणारी नदी मात्र संथपणे वाहत असते. तिच्याकडे आपलं लक्ष खूप उशीरा जातं. जे दुभंगलंय तेच पहाण्यात आपण रमतो. वास्तवापेक्षा भूतकाळात रमून विस्मयचकित होणं आपल्याला जास्त आवडतं. ही एव्हढीशी नदी—तिनं हा प्रचंड पहाड फोडला हे सत्य आपल्याला नको असतं.

पहाडाच्या रागाच्या रागा फोडत नदी वाहत राहिलेली असते आणि ती देखील हळुवारपणे. पहाडाला कळतच नाही की आपलं छाताड फोडलं जातय. त्यातून मग निर्माण होते एक खिंड.

खिंडीतून वाहणारं पाणी एका विस्तीर्ण सपाट प्रदेशात येतं, सुखावतं. त्याची धार कमी होते. त्यातून समृद्धी जन्माला येते. संस्कृती जन्माला येते. प्रवाहान चिरलेल्या पहाडातून खैबरखिंड झाली आणि त्या संथ झालेल्या प्रवाहातून भारतीय संस्कृती.

¤

—एअर फ्रान्सचं विमान तेहरानच्या मेहराबाद विमानतळावर उतरलं तेव्हा पहाटेचे तीन वाजत आले होते. कस्टमस् वगैरे आटोपून मी बाहेर आलो. दारात एक इराणी माझं नाव लिहिलेला एक मोठा ड्रॉइंगपेपर छातीशी धरून प्रत्येक प्रवाशाकडे पहात होता. मी त्याच्याजवळ जाऊन गुडमॉर्निंग केल. उत्तरादाखल त्यानं आंबट तोडानं 'टू मच लेट—नो स्लीप' अशी तक्रार केली आणि जणू काही माझ्यामुळंच प्लेन उशीरा आलं अशा घुश्शात गाडीकडे नेलं. गाडी चालवताना तो सतत सुस्कारे सोडून अल्लाला काही तरी सांगत होता. मी गप बसून होतो.

[क्रमशः]

पुस्तके

# शिक्षणावरील एक अ-शैक्षणिक पुस्तक

– छाया दातार

लोकवाङ्मयगृहाने प्रसिद्ध केलेले अ. रा. कामत यांचे 'भारतीय शिक्षणाची वाटचाल' हे पुस्तक केवळ शिक्षणक्षेत्रातील अभ्यासकांना उपयोगी नसून त्याचा संदर्भ अतिशय व्यापक ठेवला गेलेला आहे. अ. रा. कामत हे एक अर्थाने शिक्षणतज्ज्ञ नाहीत; परंतु अनेक वर्षांच्या व्यासंगाने त्यांनी शैक्षणिक समस्येविषयीचा मूलभूत विचार केला आहे. अनेक ठिकाणी त्यांची या विषयावर व्याख्याने झालेली आहेत. हेही पुस्तक मुंबई मराठी साहित्य संघाच्या व्याख्यानमालेतील व्याख्यानांचे संकलन आहे. ते स्वतःच सांगतात त्याप्रमाणे शिक्षणविषयक विचारांना त्यांनी दोन परिमाणे देण्याचा प्रयत्न केला. एक मापनात्मक आणि सांख्यिकीय परिमाण आणि दुसरे सामाजिक संदर्भाचे (राजकीय, सामाजिक, आर्थिक) परिमाण. या त्यांच्या दृष्टिकोनाचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे त्यांनी या पुस्तकात निवडलेले तीन विषय.

१) साक्षरता व प्राथमिक शिक्षणाच्या जोडीला राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम.

२) मागासवर्गांचे शिक्षण-यामध्ये स्त्रिया, अनुसूचित जाती व जमाती व मुसलमान हे चार विषय तपशीलवार मांडले आहेत.

३) इंग्रजी भाषेचे स्थान.

या तिन्ही विषयांतून मानवमुक्तीसाठी आवश्यक घटक म्हणून शिक्षण असे गृहीत धरून त्याच्या व्याप्तीचा विचार लेखक करतो. ही व्याप्ती याच शैक्षणिक धोरणाने कालौघामध्ये आपोआप साध्य होणार नाही. कारण राजकीय, सामाजिक, आर्थिक रचना त्यामध्ये कशा रीतीने अडथळे तयार करते याचे भान लेखक आणून देतो. ऐतिहासिक आढाव्याची पद्धत वापरून हा शैक्षणिक विकास आज कसा कुंठित झालाय हेही तो सिद्ध करतो. शैक्षणिक समस्यांबद्दलचा भौतिक पाया काय आहे याची समंजस जाण निर्माण करण्यास हे पुस्तक निश्चित मदत करते नाही तर आज शिक्षणपद्धतीबद्दल असंतोष अनेक विभागांकडून व्यक्त होत असतो. मात्र तो फक्त हितसंबंधी आणि व्यावहारिक पातळीवरचा असतो. स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता असलेला, दडपणे वगैरे झुगारून देऊन निर्मिती करू शकणारा, विकासाची समान संधी असलेला प्रत्येक नागरिक तयार करणे इतके व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून आखलेले शैक्षणिक धोरण व त्याची अंमलबजावणी यापासून आपण अनेक योजने दूर आहोत याची जाणीव हे पुस्तक वाचल्यावर होते.

## शैक्षणिक समस्येची व्याप्ती

पहिल्या प्रकरणात आजच्या शैक्षणिक परिस्थितीबद्दल विस्ताराने मांडणी करून या प्रश्नाबाबत बैठक तयार केली आहे. शिक्षणाच्या विस्ताराबाबत पहिल्यापासून भारतीय पुढाऱ्यांमध्येही मतभेद कसे होते ही माहिती शैक्षणिक धोरणातील वर्गीय दृष्टिकोन समजण्यासाठी महत्त्वाची आहे. दादाभाई नवरोजी, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले यांनी सक्तीची सार्वत्रिक शिक्षणयोजना आखावी असे आग्रहपूर्वक सांगितले. याउलट नागपूरचे गंगाधर चिटणीस, नबाब अब्दुल माजिद, माणेकभाय दादाभाय वगैरे लोकांनी शिक्षण सार्वत्रिक झाले तर सामान्य जनता, हलकेसलके दरिद्री लोक अनावर व डोईजड होतील असे उघडपणे बोलून दाखविले. अजूनपर्यंत ही भीती सत्ताधारी वर्गाच्या मनात डोकावत असते. राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाची योजना जनता पक्षाच्या कारकीर्दीत मान्य होऊन तिच्या पायाभूत विचारसरणीमध्ये दोन महत्त्वाचे मुद्दे होते. प्रौढ शिक्षण योजनेच्या अध्यापनप्रक्रियेमध्ये साक्षरतेवर भर एवढेच अनुस्यूत नसून त्यांच्या (कामाच्या व इतर) दर्जात निश्चित वाढ व्हावी आणि दरिद्री व निरक्षर जनतेत स्वतःच्या दुरवस्थेविषयीची जाणीव निश्चितपणे वाढावी, अशी अपेक्षा होती. गरिबांची अस्मिताजागृती व संघटन करणारा हा साक्षरता-कार्यक्रम होता. लेखकाच्या मते हे शब्दप्रयोग गुळगुळीतपणाने व पोकळपणाने वापरले गेले आहेत. कारण स्वजागृतीचा अर्थ शोषकवर्गाविरुद्ध उभे रहाणे. असे उभे राहिल्यानंतर शासनाची दमनयंत्रणा कोणाची बाजू घेईल याबद्दल स्पष्टता या विचारसरणीत नाही आणि तरीही लेखकाला आशा होती की, किमान तीन गोष्टी या कार्यक्रमातून साध्य होतील.

१. प्राथमिक शिक्षण व प्रौढ-साक्षरता यांच्या दुरवस्थेविषयी पुन्हा एकदा जाणीव जागृती. २. स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते यांना नवे प्रयोग व जनसंघटन करण्याची संधी. ३. काही नवा दृष्टिकोन देणाऱ्या पुस्तिका व इतर साधनसामग्री. लेखकाचा आशावाद पुस्तक प्रसिद्ध होता होताच फसला आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेतच त्याने जाहीर कबुली देऊन टाकली आहे. एका बाजूने या योजनेचे सरकारीकरण झाले. दुसरीकडे शिक्षणविषयक भूमिका बदलून फक्त 'कार्यात्मक विकास व स्वशिक्षणाची सवय वाढविण्यासाठी अवश्य ती सामाजिक जाणीव' एवढेच मर्यादित उद्दिष्ट या भूमिकेने समोर ठेवले आणि इंदिरा गांधी सरकारने तर ही योजनाच बंद करण्याचे धोरण घेतले आहे ! चळवळ, जनसंघटन व साक्षरता यांची सांगड घातल्याखेरीज राष्ट्रव्यापी स्वरूपाचे आणि वेगवान शिक्षितीकरण होणे अशक्य आहे, या निष्कर्षावर लेखक पोचतो. आर्थिक, सामाजिक दैन्यदारिद्र्य व निरक्षरता यांचे संबंध द्वंद्व स्वरूपाचे आहेत हे ओळखण्याची आज गरज आहे.

## मागासवर्गीयांना समाजाचे देणे

मागासवर्गाचे शिक्षण या प्रकरणात 'मुसलमान' विभागावर काही वस्तुनिष्ठ माडणी करून अनेक धार्मिक द्वेषावर आधारित पूर्वग्रहांना धक्का दिला आहे. मुसलमान समाजही मागासलेला–आर्थिक व सामाजिकदृष्टया–तेव्हा त्याच्या शिक्षणाचा वेगळा विचार झाला पाहिजे, हे आवर्जून मांडले आहे

स्त्रियांच्याही बाबतीत स्त्री हा सामाजिकदृष्ट्या दुर्बल लैंगिक घटक हे लक्षात घेण्याची आवश्यकता लेखक माडतो. स्त्री हा विभाग समाजाच्या सर्व वर्गांत विभागला गेल्याने व उच्चवर्गातील स्त्रियांची शिक्षणात लक्षणीय प्रगती झाल्याने सर्वसामान्य स्त्रियाच्या शैक्षणिक मागासलेपणाकडे पुष्कळदा दुर्लक्ष होते; परतु आर्थिक परावलंबित्व, गरिबी, अंधश्रद्धा, धार्मिक दुय्यम भावनेचे संस्कार याचा परिणाम होऊन अजूनही घटनेमध्ये समानता घोषित करून स्त्रियाच्या साक्षरतेचे व शिक्षणाचे प्रमाण पुरुषांइतकेही नाही.

दुसऱ्या महत्त्वाच्या मुद्द्याकडे लेखक लक्ष वळवितो की, अजूनही स्त्रीपुरुषांच्या समान भूमिकेबद्दल निःसदिग्ध पुरस्कार केला जात नाही आणि मुलींना अनुरूप अभ्यासक्रमाचा विचार होताना मुलींची पारंपारिक कामे, अपत्यसंगोपन व गृहकृत्य हीच डोळ्यांसमोर ठेवली जातात. मुलानीही शिवण–टिपण, स्वयंपाक, निवडण या गोष्टी शिकण्याच्या आवश्यकतेचे संस्कार मुलांवर होत नाहीत.

या दोन्ही विभागांच्या बरोबरीने आर्थिक दुर्बलतेबरोबर सामाजिकदृष्ट्याही दुर्बलता ज्याना प्राप्त आहे, माणूस म्हणून जगण्याच्या आकांक्षेला जे मुकले आहेत, त्या अस्पृश्य जाती व आदिवासी जमाती–त्याच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प असणे अगदी स्वाभाविक आहे. लोकसंख्येमध्ये त्याचे प्रमाण अनुक्रमे १५ व ७ टक्के आहे. राष्ट्रीय चळवळीचा वारसा म्हणून या विभागाला बरीच आश्वासने मिळाली. घटनेमध्ये काही आर्थिक सवलती मिळाल्या. असे असूनही या समाजातील शिक्षणाचे प्रमाण इतर समाजापेक्षा खाली राहिले आहे याची नोंद महत्त्वाची आहे. याचा अर्थ जातीयवादी सामाजिक शक्ती किती जबरदस्त आहेत हे लक्षात येते. त्या समाजातील आर्थिक दुबळेपणही इतर समाजाच्यापेक्षा अधिक विस्तृत आहे. नोकऱ्यामधील राखीव जागांच्या प्रश्नाची चर्चा करून या जागाबद्दलचा असंतोष हा कुचंबलेल्या अर्थव्यवस्थेशी संबधित असल्याचे दाखवून या राखीव जागाचे सध्याच्या परिस्थितीत समर्थन लेखक करतो. दोन्ही बाबतीतील बरीचशी आकडेवारी उद्धृत करून याही प्रश्नाची व्याप्ती आणि सोडवणुकीचे अल्प प्रयत्न हे आपल्यासमोर येतात. नोकऱ्यांच्या भरतीमध्ये जातीजमातींना पक्षपात दाखविण्याचे धोरण प्रत्येक राज्यकर्ता वर्ग ब्रिटिशाच्या काळापासून आजतागायत करत आला असल्याचा ऐतिहासिक संदर्भही येथे जोडलेला आहे. आंध्र प्रदेशातील दोन प्राध्यापकांनी माध्यमिक शाळांच्या केलेल्या पहाणीचे दाखलेही उद्बोधक आहेत.

## न सुटणारा प्रश्न

'इंग्रजी भाषेचे स्थान' या लेखामध्ये इंग्रजी भाषेसंबंधी घेण्यात येणाऱ्या दुटप्पी भूमिकेची पार्श्वभूमी अतिशय सूक्ष्म रीतीने मांडली गेली आहे. मातृभाषेला व प्रादेशिक भाषाना महत्त्व देण्याचे घोषित मूल्य आणि प्रत्यक्षात इंग्रजी भाषेचा अट्टाहास, तिला व्यवहारात मिळणारे महत्त्व आणि त्या भाषेमुळे मिळणारे फायदे सोडायला वरिष्ठ वर्गाचा नकार, या सगळ्यातून आजचे 'इंग्रजी' भाषेबद्दलचे राजकारण तयार झाले आहे. परकीय तंत्रज्ञान, परकीय व्यवस्थापनाची शैली हे आयात होत असताना इंग्रजीसारख्या परकीय भाषेचे व्यवहार वाढणे स्वाभाविक आहे आणि त्याचा प्रभाव शिक्षणावरही पडणे सहज आहे. गंमत म्हणजे महाराष्ट्रात राजकीय सत्ता ज्याच्या हातात आहे त्या सधन ऊस-शेतकऱ्यांनासुद्धा इंग्रजी भाषेने सतावले आहे आणि त्यानी साखरकारखान्यांच्याजवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या आहेत. आर्थिक प्रेरणा राजकीय व्यक्तीवरही कशा वर्चस्व गाजवितात त्याचे हे उदाहरण आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून इंग्रजी भाषा कामचलाऊ, कार्याभिमुख बनली हे स्वागतार्ह आहे असे लेखक म्हणतो; पण त्याच वेळी शालेय अभ्यासक्रमामध्ये इंग्रजी जीवनातील साहित्यिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरांवर भर असतो आणि याचे व्यापक पाश्चात्य संदर्भ माहीत नसल्यामुळे विद्यार्थ्यांची दमछाक होते आणि संमिश्र, संकरित अशा भरड सांस्कृतिक वारशाच्या गुरफटीतून आपण बाहेर पडू शकत नाही आणि खास भारतीय आधुनिकीकरण घडून येत नाही. कनिष्ठ वर्गीयांचा पण इंग्रजीकडे ओढा; कारण ते उच्च वर्गीयांचे अनुकरण करून प्रतिष्ठेचा व वेतनाचा वरचा स्तर गाठू इच्छितात आणि उच्चवर्गीयांना आतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळविण्यास ही भाषा उपयोगी पडते. अशा सगळ्या गुंत्यामुळे लेखक म्हणतो की, 'इंग्रजी भाषेचा प्रश्न हा राजकीय इच्छेचा प्रश्न बनतो आणि आर्थिक, सामाजिक, राजकीय परिवर्तनांसाठी, दास्यमुक्तीसाठी, व्यापक लोकशाहीकरणासाठी जो नवा लढा उभा रहातो त्याचा हा अपरिहार्य भाग बनतो.'

समारोपामध्ये आपण हे तीन विषय एकत्रित निवडल्याचे समर्थन लेखक देतो आणि ते योग्य वाटते. या तिन्ही विषयांबाबत आपण स्वातंत्र्य मिळताना वचनबद्ध झालो होतो. त्या वचनांचे काय झाले याचा आढावा तीस वर्षांनी घेणे आवश्यक आहे; आणि मुख्य म्हणजे शैक्षणिक लढा हा केवळ राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न नसून गुंतागुंतीचा, लांब पल्ल्याचा आणि दीर्घ परिश्रमाचा, असीम स्वार्थत्यागाचा आहे याचे भान तरुणांनीही ठेवणे आवश्यक आहे. □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुण

# हेन्री किसिंजरबरोबर....

पुस्तकओळख । माधुरी बापट ( अमेरिका )

टी. व्ही. वर 'Donohue' कार्यक्रमात लेखक व पुस्तकाची ओळख ऐकली तेव्हापासून ते मिळवून वाचण्याची खटपट केली. कारण किसिंजरविषयी मिळेल ते वाचून काढायचं हे ठरवलेलं. डॉ. हेन्री किसिंजर-जगातील अत्यंत बुद्धिमान व्यक्ती, ही ओळख प्रथमपासून होतीच; पण अशा गाजलेल्या राजकारणातल्या व्यक्तीकडे इथे Political Hero ह्या दृष्टीनं पाहातात हे मात्र नवीनच ऐकलं. थोर व्यक्तीच्या कार्याबरोबरच त्याच्या खासगी जीवनाविषयीही माहिती करून घेण्याची उत्सुकता आपल्यासारख्या सामान्याना असतेच. त्याचबरोबर अशी माहिती कोण सांगतं आहे यालाही महत्त्व आहेच.

किसिंजरचे Vit & Wisdom पहिल्या भागात वर्णन करताना लेखकाने सुरवात पहा कशी केलीय–

'व्हेनिझुएलामधील शेरेटन हॉटेलमध्ये दोन प्रवासी. एक म्हणतो 'अरे, तो बघ रिचर्ड व्हलेरियानी.' त्यावर दुसरा उत्तरतो, 'म्हणजे इथे नक्कीच किसिंजर असणार!'

जाता जाता लेखकाने आपलीच पाठ थोपटून घेतली आहे खरी; परंतु किसिंजरच्या कारकीर्दीत त्याच्या सावलीप्रमाणे त्याच्याबरोबर वार्ताहर म्हणून अख्खी पृथ्वी पालथी घातली आहे त्या NBC च्या Diplomatic Correspondent रिचर्ड व्हलेरियानी यानी लिहिलेल्या 'Travels with Henry' ह्या पुस्तकाला म्हणूनच महत्त्व प्राप्त झालं आहे.

'व्हलेरियानी' हे नाव उगीचच वासवानी; वासवानीच्या पंक्तीतलं वाटतं आणि जाड भुवया असलेला लेखकाचा चेहरा Typical सिंधी माणसाची आठवण करून देतो, तेव्हा उगीचच ह्याचे पूर्वज कोणी तरी भारतीय असावेत अशी शंका चाटून जाते.

गेली १९ वर्षे व्हलेरियानी NBC साठी काम करत आहेत. व्हाइट हाउस, स्टेट डिपार्टमेंटचा वार्ताहर म्हणून काम करताना लेखक म्हणतो, 'अध्यक्षाचा वार्ताहर म्हणून काम करताना प्रवास ही चीजच नसे. फार तर वीकएन्डला कँप डेव्हिड व एखाद्या व्हेकेशनला फ्लोरिडा वा कॅलिफोर्निया!' परंतु किसिंजर असताना स्टेट डिपार्टमेंटमध्ये काम करताना लेखकाने जवळ जवळ नव्वद देशातून वार्ता पाठवल्या नि ५ लाखाहूनही जास्त मैलाचा प्रवास केला.

बाह्यत: रुक्ष, गंभीर वाटणाऱ्या डॉ. किसिंजरविषयी 'आपण विनोदी पुस्तक लिहिणार आहोत,' असे म्हटल्यावर इतरांनी लेखकाला वेडयात काढले; पण एरवी ऑफिसमध्ये कपाळावर आठयाचे जाळे पसरून, चतुरपणे सर्व गोष्टीचा वेध घेणाऱ्या गंभीर प्रकृती किसिंजरची विमानप्रवासात, परदेशात उसळून येणारी विनोदी बुद्धी, विचित्र सवयी लेखकाने बरोबर हेरल्या आहेत.

परदेशात एकदा एका वार्ताहराने किसिंजरना विचारले, 'तुम्ही आता लगेचच वॉशिंग्टनला परत जाणार का?' त्यावर किसिंजर उत्तरले. 'I only visit friendly Capitals.'

बोलता बोलता किसिंजर दुसऱ्याची कशी टिंगल करीत असे त्याचं उदाहरण पाहा– 'Marvin and Bernard' Kalb ह्या CBS च्या वार्ताहर जोडीने 'Kissinger' नावाचं पुस्तक लिहिलंय. त्यावर दोघानी प्रत्यक्ष किसिंजरलाच त्याचं मत विचारलं. तेव्हा ते म्हणतात, '*I did not read the* book, but I like the title.' ह्या पुस्तकात किसिंजरविषयी अशा काही बतावण्या केल्या आहेत, की त्यावर किसिंजर म्हणतो, 'After that introduction there is nothing left for me to do but walk on water.'

किसिंजरच्या बुद्धिमत्तेविषयी जगातील थोर व्यक्तींनी दिलेली कबुली नि केलेली वर्णने याची उदाहरणे तरी किती द्यावीत! एकीकडे वाचत असताना तेवढ्याच तन्मयतेनं हा गृहस्थ ऑफिसमध्ये आलेल्या माणसाचं बोलणं किंवा फोनवरील बोलणं पुस्तकातील लक्ष काढून न घेता ऐकत असे व त्याला बरोबर उत्तर देत असे.

एका ब्रिटिश लेखकाने किसिंजरचे एक पुस्तक वाचून तर म्हटले, 'I don't know if Mr. Kissinger is a great writer but anyone finishing this book is a great reader.'

परंतु अशा दि ग्रेट गृहस्थालाही प्रसंगी सुनावणारे अमेरिकन वार्ताहर किती ग्रेट असतील नि त्यानी आपला व्यवसाय किती उच्च पातळीवर नेऊन ठेवलाय याची कल्पना येते.

दमास्कसच्या भेटीच्या वेळी विमानात किसिंजर लेखकाला बोलवून विनंती करतो की, निदान तुम्ही तरी भलते प्रश्न विचारून परदेशात माझी भंबेरी उडवू नका! त्यावर लेखक काय उत्तरतो पहा–'Mr. Secretary, I don't want to sound harsh about this but there is something I ought to explain. As American citizens we may be sittiug back there roating for you to succed. But as professional journalist we don't care whether you succeed or fail.'

किसिंजरसारख्या ग्रेट माणसाची girl friend म्हणून माझ्यासारख्या स्त्रीकडे बोट दाखवले तर ती ढगातच जाईल; पण ग्लोरिया स्टायनमसारखी तडफदार स्त्री काय उकरते पहा–'I never have been & I never will be Henry Kissinger's girl friend.'

लहानपणी जर्मनीतून पळून आल्यावर अनवाणी पायानी न्यूयॉर्कमध्ये फिरणारा हा जर्मन ज्यू–मेंदू म्हणजे आज अमेरिकेचं भूषण आहे त्याच्या इंग्रजीच्या जर्मन ॲक्सेंटविषयीही बऱ्याच गंमती सागतात. 'American dream with German accent' असं तर म्हणतातच; पण एकदा अध्यक्ष निक्सन इस्राएलच्या गोल्डा मायरला म्हणतात, 'काही म्हणा पण आपल्या दोन देशात

एक साम्य जरूर आहे, दोघांचे परराष्ट्रमंत्री ज्यू आहेत ! ' त्यावर गोल्डा मायर म्हणते ' yes, but mine speaks English without an accent.'

जगातली नंबर एकची बुद्धिमान समजली जाणारी युरोपियन ज्यू ही एकच जात अशी आहे की, तिचा हेवा करावा. अमेरिकेला जगाचा गुजराथ व अमेरिकन माणसाला गुजराथी म्हटलं तर ज्यू हे जगातले मारवाडी समजावे लागतील ! त्यांच्या कंजुषीविषयी, व्यापारनैपुण्याविषयी सांगावे तेवढे थोडेच. वरवर गोड बोलून केसाने गळा कापणाऱ्या अमेरिकन्सनी ज्यूंना आश्रय दिला म्हणून ! नाही तर आइनस्टाइनच्या Theory of Relativity ला ' Jewish physics ' म्हणणाऱ्या हिटलरपुढे नि आइनस्टाइनला ' bourgeois intellectual ' म्हणणाऱ्या चीनच्या ' Gang of four ' पुढे ह्या जमातीचे कठीणच होते.

आपल्या जातीविषयी, धर्माविषयी कट्टर स्वाभिमान बाळगणाऱ्या किसिंजरने, ह्या पूर्वी झालेला अपमान लक्षात ठेवून चीनच्या भेटीच्या वेळी चौ एन लायना काय सुनावले पहा. एकदा चौ एन लाय किसिंजरला म्हणतात, ' You are a very intelligent man Dr. Kissinger ! ' त्यावर किसिंजर उत्तरतात, ' That means Mr. Prime Minister, that from a Chinese point of view, I am of mediocre intelligence ! '

किसिंजरच्या ' ईगो 'चे वर्णन करताना ॲटर्नी जनरल जॉन मिचेल किसिंजरला ' Egotistical Maniac ' म्हणतात; पण एकदा खास मित्र नेल्सन रॉकफेलर यांनी किसिंजरच्या एका भाषणात काही तरी दुरुस्ती केली. त्यावर नापसंती दर्शवताना किसिंजर म्हणतात, ' When Nelson buyes a Picasso, he does not hire four housepainters to improve it. '

स्वतःच्या बुद्धिमत्तेबरोबरच चारित्र्याविषयी किसिंजरला अत्यंत अभिमान आहे. त्यावर बोलताना किसिंजर म्हणतात,

' I know I have a first rate mind, but that is not source of pride to me. Intelligent people are dimea dozen but I am proud of having character. '

ह्या लठ्ठ बुटक्या बटुमूर्तीच्या लठ्ठपणावर लेखक लिहितो– ' When he negotiated, he got nervous, he ate and since he was always negotiating, he was always eating. '

पोटॅटो चिप्स नि चॉकलेट्स म्हणजे लठ्ठपणावर औषधच; पण मानसिक Depression आल्यावर किसिंजर दोन्हीवर आडवा हात मारत असे.

स्वतःच्या weak points वर, drawbacks वर बोलायला किंवा ते दुसऱ्याला कळू द्यायला, भावनांच्या गुंत्यात सापडायला किसिंजरला बिल्कुल पसंत नसे. त्याच्या ह्या पाषाणहृदयाला पाझर फोडणारी एकच व्यक्ती होती.. ती म्हणजे बोलिव्हियाचे अध्यक्ष ! ' It would have been improper for me to greet you at airport as the President of Bolivia because of Protocal. But power is temperory and Citizenship is permenent and as a citizen of Bolivia I did not want to miss your arrival and so I was there with my wife & children in the croud that greeted you at the airport. ' यावर हेलावून गेलेले किसिंजर एवढेच म्हणतात. ' Mr. President I am very touched by that. ' पण स्वतःच्या ईगोमुळे ही गोष्ट प्रसिद्ध करायला त्या वेळी किसिंजरने वार्ताहरांना बंदी घातली.

किसिंजरचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ' — Tart bitterness with hidden but tender heart. '

लेखकाने वर्णन केलेल्या, सांगितलेल्या असंख्य गोष्टी इथे लिहिणे अशक्यच आहे. चीन, रशिया, इजिप्त, इस्राएल, सौदी अरेबिया वगैरे देशांतून लेखकाने किसिंजरबरोबर केलेल्या प्रवासाचे नि त्यातून किसिंजरच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे घडणारे दर्शन हे केवळ ते पुस्तक वाचूनच कळेल.

निरनिराळी असंख्य कार्टून्स व सादत, गोल्डामायर, ग्रोमिको वगैरेंबरोबरचे जिवंत फोटो यानी पुस्तक शोभिवंत केलंय्.

पुस्तकाचा शेवट करताना, State Secretary म्हणून रिटायर्ड होणाऱ्या व सर्वांना पुरून उरलेल्या ह्या व्यक्तीविषयी, लेखक लिहितो–

My Critics all want to burn me alive. But there is one thing I've learned–and that's how to survive.
That's why Henry will stay.

¤

पुस्तकाचे नाव : Travels with Henry.
लेखक : Richard Valeriani.
प्रकाशक : Houghton Mifflin Co.
2 Park St, Boston
Massachusetts 02107 (1979)


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....
नाझी भस्मासुराचा उदयास्त
लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## दिलने जिसे पाया था....पृष्ठ ६ वरून

में झूठा गुस्सा, बंद पलक में प्यार', 'लाल छडी, मैदान खडी,' 'तुम मुझे यूं ना भुला न पाओगे' अशी कित्येक उदाहरणे देता येतील. तीच गोष्ट द्वंद्वगीताची– 'सर पे टोपी लाल, हाथ में रेशम का रुमाल', 'तू छत पर आ जा गोरिये,' 'एक शहनशाह ने बनवा के हँसी ताजमहल', 'ओ मेरे सोना रे, सोना रे,' 'देखो कसम से कसम से' आणि अशीच किती तरी!

जवळजवळ सव्वीसहजार ध्वनिमुद्रिकामध्ये आपल्या आवाजाचा गहिरा ओलावा साठवून ठेवून आज अचानक हा जलाशय नाहीसा झाला. जणू स्वर्गलोकीचा हा गंधर्व स्वतःला उःशाप मिळताच अंतर्धान पावला! प्रणयगीतापासून भक्तिगीतापर्यंत सगळी गीते छेडून स्वरशारदेच्या दरबारातील हा गायक आता अबोल झाला!

कोणत्याही कलाकारातील कलाकार जिवंत असतानाच तो जग सोडून गेला, तर होणाऱ्या दु:खात रंगलेली मैफील अर्धवट मोडल्याची जाळती हुरहुर जास्त जीवघेणी असते.

रफी गेल्याचे दु:ख तसेच जाळते आहे.
रफीचे एक गाणे आहे–
'सौ बार जनम लेंगे।'
आणि त्याचेच दुसरे गाणे आहे–
'जो वादा किया, वो निभाना पडेगा।'

□

# मौत कितनी भी शानदार सही

प्राध्यापक सुरेशचंद्र नाडकर्णी

"अब तुम्हारे हवाले वतन साथियों"

"....तन, मन, प्राणांची कुरवंडी करून निघालोय्.... दोस्तांनो, आता सर्व काही तुम्ही साभाळाय्चं आहे...."

पावसात भिजलेली सायंकाळ आणखीच उदास वाटत होती. हजारों रसिक अंत्ययात्रेत खाली मान घालून चालत होते. हळूहळू कब्रस्तानाकडे सरकत जाणारा, फुलांनी शोभिवंत केलेला जनाजा.... कुठं तरी मन चुकचुकलं–

मौत कितनी भी शानदार सही
जिन्दगी का मगर जवाब नही॥

डोळ्यासमोरून जनाजा सरकत होता. मन मात्र कोठे तरी भूतकाळात भरकटत होतं. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वीची एक संध्याकाळ आठवली. मला वाटतं स्वर्गीय धुलुभाई जसदनवाला यांच्याकडे काही खाजगी समारंभ असावा. त्यांच्या घरी कलावंतांना नेहमीच मुक्तद्वार असायचं. कुणी पाठमोरी व्यक्ती फुलाफुलांचा बुशशर्ट घातलेली गप्पा मारण्यात अगदी दंग होती. मध्येच हास्याची हलकी फेर उसळत असे. चेहरा दिसत नव्हता; पण काही विषय निघाला असावा अन् त्या व्यक्तीनं कानाच्या पाळीला स्पर्श केला. संगीत क्षेत्रातल्या खानदानी कलावंताची ही खास लकब. उस्ताद–बुजुर्गांचं नाव घेताना कानाच्या पाळीला स्पर्श करून मगच आदरानं नाव उच्चारायचं. माझं कुतुहल जागृत झालं अन् काहीसं निमित्त करून त्या मंडळीत मिसळलो. कारण हा कलावंत कोण हे जाणून घ्याय्चं होतं...जवळची अशी ही पहिली अन् शेवटची भेट!...

साडेपांच फुटाच्यावर उंची, भरदार खांदे, मस्त गर्दन, गव्हाळ रंग, मागे वळविलेले केस अन् अकारण चेहऱ्यावर सतत विलसणारं अस्पष्ट स्मितहास्य असं काहीसं व्यक्तिमत्त्व आठवतं. तसं खास लक्षात राहण्यासारखं काहीच नव्हतं पण प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा ठसा मात्र निश्चित लक्षात राहिला आहे. त्या वेळी महंमद रफी याचे नाव माहित असण्याइतपत प्रसिद्ध खासच होतं; पण आजच्यासारखं असामान्यत्वाचं वलय मात्र त्याभोवती नव्हतं; पण आज सव्वीसहजारापेक्षा अधिक गीते ध्वनिमुद्रित करणाऱ्या आवाजाचे असामान्यत्व वर्णन करायला आणखी कोणता मानदंड हवा?

बोलण्या बोलण्यात किराणा खानदानचे उस्ताद वहीदखाँ मरहूम यांच्याकडे घेतलेली तालीम समजली. उस्तादांचा रियाज–अगदी कसून रियाज अन् मेहनतीने सूर लावण्यावर फार भर असायचा आणि या मातबर शिष्यानं अखेरपर्यंत ती उस्तादांनी घालून दिलेली शिस्त मोडली नाही. अगदी साधंसुधं गाणं का असेना, पण पूर्ण समजून, जाणून रियाज केल्याशिवाय कधीही ध्वनिमुद्रण केलं नाही. पतियाळा खानदानचे उस्ताद बडे गुलामअलीखाँ मरहूमकडे देखील महमद रफी यांनी तालीम घेतली होती. केवळ सिनेमागीतांमुळे प्रसिद्ध असणाऱ्या या गायकाची शास्त्रीय संगीताची बैठक अतिशय मजबूत होती आणि व्यासंगदेखील होता.

आवाजाचा स्रोत मोठा परंतु घुमारा अजिबात नाही. दोन अडीच सप्तके सहज फिरणारा आणि स्वच्छ सच्चा सूर लावणारा असं रफीच्या आवाजाचं थोडक्यात वर्णन करता येईल. आवाजाची देणगी नैसर्गिक होती की नाही याची माहिती निदान मला नाही; परंतु अतिपरिश्रमाने घासून तयार केलेला आणि त्यातले बारीकसारीक कंगोरे पूर्णपणे काढून टाकून अगदी मुलायम बनविलेला गोल आवाज होता. यापूर्वी सिनेसंगीताला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा स्वर्गीय के. एल्. सैगल याचा एक दैवी आवाज होता. त्यातील दर्द, मिठास, उर्दू उच्चारांची लोच सर्वच काही विलक्षण होतं. त्यांचा आशिर्वाद रफी याना लाभला होता असं म्हणतात.

त्याच्यानंतर रफी यांचा जमाना सुरू झाला. त्या वेळी छोटया रफीचे कौतुक करणारे सैगल हयात असते तर सव्वीसहजारांहून अधिक गीते ध्वनिमुद्रित करणाऱ्या आवाजाच्या विक्रमाबद्दल त्याना काय वाटलं असतं याची कल्पनाच करवत नाही!

नौशाद आणि जयदेव याच्या शास्त्रोक्त धाटणीच्या रचना रफीच्या साफसुथऱ्या गळ्यातून सहजपणे साकार होत. ओ. पी. नय्यर यांच्या उडत्या नखरेल चाली त्यांच्या आवाजातील ताजगी अन् तरतरीतपणामुळे अधिकच आकर्षक वाटत. शास्त्रोक्त संगीतापासून लोकगीतापर्यंत, आजकालच्या जमान्यात पाश्चात्य सुरावटीवर बांधलेल्या भ्रष्ट चाली देखील रफीच्या आवाजात त्या मूळ भारतीय

चालीच असाव्यात इतक्या गोड वाटत असत.

'मन तडपत हरि दरसन को आज' (बैजू बावरा) अथवा 'तू गगाकी मौजमे जमना की धारा' या रफीच्या आवाजात साकार झालेल्या शास्त्रीय धाटणीच्या गीताची गोडी आज पंचवीस वर्षे होऊन गेली तरी अद्याप कायम आहे. गजल हा भारतीय संगीतातला एक खास 'बाज' आहे. शास्त्रीय संगीत जाणणाऱ्या कलावंताना देखील तो मुश्किलीनेच साध्य होतो. कारण त्याला एक खास रसीली तबियत लागते; पण 'चौदवीका चांद हो या आफताब हो' (चौदवी का चांद) यासारखी रुमानी – शृंगाररसपूर्ण – गजल अथवा 'ना किसीकी आंख का नूर हूं' (लाल किला) सारखी अतिकारुण्यपूर्ण गजल साकार करणारा आवाज रफीचाच होता. 'है कली कली के लबपर तेरे हुस्न का तराना' (लाला रुख) किंवा 'यूं तो हमने लाख हसी देख है, तुमसा नही देखा' (तुमसा नही देखा) सारखी जवान गीते गाणारा आवाज रफीचाच होता. त्या आवाजात काय बदल होत असे हे शब्दात माडणे मोठे कठीण काम आहे पण गीताच्या आशयाबरोबर आवाजात काही तरी विलक्षण बदल होतो, त्याची जातकुळीच बदलून जाते असे मला अनेकदा जाणवले आहे. गजलेत जाणवणारा दर्दभरा आवाज अन् या जवानगीतात मोहून टाकणारा जोषपूर्ण आवाज तोच आहे किंवा शास्त्रीय धाटणीच्या गीतातला धीरगंभीर आवाज देखील तोच, यावर सागून विश्वास बसू नये. 'ले के पहला पहला प्यार, भरके आँखोमे खुमार (सी. आय्. डी.) यासारखी उथळ अवखळ गाणी म्हणणारा आवाज देखील तोच. फार काय 'दिल जो न कह सका वाही राजे दिल कहनेकी रात आयी' (भीगी रात) सारखी भावनेने ओथंबलेली भावुक रचना साकार करणारा तोच आवाज होता. 'कोई मुझे जगली कहे' (जंगली) किंवा रॉक अँन्ड रोल धर्तीची 'लाल लाल गाल' (मिस्टर एक्स) सारखी पाश्चात्य सगीताच्या सुरावटीवर आधारलेली गीते हा आवाज सहजपणे साकार करू शकला. एकाच गळयातून निघणाऱ्या या असख्य धर्तीच्या चाली अन् सुरावटी आणि त्यावर सारखीच हुकुमत ठेवणारा आवाज अनेक शतकात केव्हा तरी एकदाच योगायोगाने निर्माण होतो.

'गुलबलोच' या पजाबी चित्रपटात 'शामसुदर' या जुन्या जमान्यातील सगीतदिग्दर्शकानी रफीच्या आवाजाचा प्रथम उपयोग करून घेतला. त्या वेळची मातबर गायिका 'झीनत बेगम' हिच्याबरोबर रफीचे पहिले गीत ध्वनिमुद्रित झाले. गुलाम हैदर यानी 'शहीद' या बोलपटासाठी ध्वनिमुद्रित केलेले 'वतन की राहमे वतनके नौजवां शहीद हो' हे गीत अतिशय लोकप्रिय झाले. या गाण्याचे वेळीदेखील खानमस्तान हा त्या वेळचा सुप्रसिद्ध गायक रफीच्याबरोबर गायला. त्यानंतर मलिका–ए–तरन्नुम नूरजहाँ बरोबर गायलेलं 'यहाँ बदला वफा का बेवफाई के सिवा क्या है' हे द्वंद्वगीत तर एक जमाना गाजवून गेले. त्या नतर सुमारे वीस वर्षे रफीच्या आवाजातील ध्वनिमुद्रिकानी जगाच्या कानाकोपऱ्यातील कोट्यवधी लोकाना आनंद दिला आहे.

अलीकडे, म्हणजे सिनेजगताच्या बोलीभाषेत– राजेश खन्ना जमान्यात म्हणजे १९७२ ते १९७५ कालखंडात रफीला जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण झाला होता. ज्याला एके काळी रफीने उसना आवाज दिला तो किशोरकुमारच त्याचा प्रतिस्पर्धी बनला! पण तोही काळ गेला अन् पुन्हा रफीच्या ध्वनिमुद्रिका गाजू लागल्या. गेल्याच वर्षी 'क्या हुवा तेरा वादा' या रफीच्या आवाजातील गीताने अॅवॉर्ड मिळवून 'हमेशा जवान' आवाजाची सत्यता पटविली!

गाधीहत्येनंतर ध्वनिमुद्रित झालेलं 'सुनो सुनो ऐ दुनियावालों, बापूजीकी अमर कहानी' हे रफीचं गीत तर पाकिस्तानात देखील अतिलोकप्रिय ठरले.

उण्यापुऱ्या एकूणचाळीस वर्षांची दीर्घ कारकीर्द असणारा रफी आजकाल मात्र नव्या फिल्मी गीताना विटला होता, तरुण संगीत दिग्दर्शक काही नवी रचना न करता जुन्या त्याच त्याच चालीवर थोडेफार फेरफार करून तीच रचना पुन्हा पेश करतात आणि मला तीच चाल तीन तीनदा म्हटल्यागत भास होतो असे मोठ्या कडवटपणाने परंतु जाहीरपणाने त्याने भाष्य केले.

शामसुदर, अनिल विश्वास, खेमचंद प्रकाश वगैरे संगीतकारांच्या पिढीनंतर नौशाद, सचिनदेव बर्मन, मदन मोहन, शंकर–जयकिशन यांची पिढी व त्यानतर अगदी राकेश रोशनपर्यंतची संगीतकाराची तिसरी पिढी रफीने पाहिली. तीन पिढ्या सतत त्याच उभारीत, जवान जोषपूर्व सुरात गाणारा आवाज आता कायमचा शात झाला आहे! ☐

## आंध्रप्रदेश : पृष्ठ ४ वरून

हे राजकीय जीवदान आहे.

दोन्ही गटात समझोता घडवून आणून त्यानी सहकार्याने काम करावे असा प्रयत्न इंदिरा कॉंग्रसचे निरीक्षक भीष्म नारायणसिंग करणार आहेत; पण हे प्रयत्न करीत असतानाच नव्या नेत्याचा शोध चालू राहील. दोन्ही गटानी एकजुटीने कार्य करावे या पक्षश्रेष्ठींच्या सल्ल्यास विरोधी गटाने फारसा अनुकूल प्रतिसाद दिलेला नाही, एकूण २६ कॅबिनट मत्र्यांपैकी १६ मंत्री विरोधी गटाच्या बाजूला आहेत. अशा परिस्थितीत मुख्यमंत्र्याना अपेक्षित सहकार्य या गटाकडून कसे मिळणार? मंत्रिमडळाची पुनर्घटना करण्याची परवानगी रेड्डी गेला सहा महिने मागत आहेत; पण श्रेष्ठीनी त्याना ती दिलेली नाही. पक्षातील सघर्ष त्यामुळे अधिकच वाढण्याची शक्यता त्याना वाटते.

आध्रमध्ये नेतृत्वबदल केला तर तशीच मागणी इतर राज्यातून होऊ लागल. कर्नाटकाचे गुडूराव आणि हरियानाचे भजनलाल याच्या विरुद्धही गट आहेत. तसेच नव्याने निवडणुका झालेल्या राज्यातही नतृत्वबदलाची मागणी केली जाण्याचा सभव आहे. ही सरकारे अजून स्थिर व्हावयाची आहेत. प्रश्न लाबणीवर टाकल्याने सुटत नाहीत. ठाम भूमिका घेऊनच ते सोडवायला हवेत. पक्षबांधणीला गटस्पर्धेचे ग्रहण हा प्रश्न जुनाच आहे. गटस्पर्धा सत्तेशी निगडित आहे. सत्तेच्या राजकारणाचाच तो अपरिहार्य भाग आहे; पण जुना प्रश्न जुन्याच उपायानी सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत. ☐

# हिचकॉकच्या कथा । कथा सातवी

## स्वैर अनुवाद । रवींद्र गुर्जर

# शिकार

अखेर टोनीच्या कल्पनेला आम्ही मान्यता दिली. तो, मी आणि माझी मैत्रीण जेन-रात्रीचा खेळ पाहून नुकतेच बाहेर आलो होतो. चित्रपट भिकार निघालाच; पण आमचे खिसेही पूर्ण मोकळे झाले होते. मध्यरात्रीचा सुमार. थोडे पैसे मिळवण्याचा मार्ग शोधणं आवश्यक होतं. तेही ताबडतोब.

त्याच वेळी आम्हाला हा 'पाहुणा' दिसला.

थिएटरसमोर हा जाडा इसम बाहेर पडणाऱ्या *तरुण मुलांकडे आशाळभूतपणे* बघत होता. त्याचा चेहरा बथ्थड असला तरी डोळे वखवखलेले दिसत होते. त्याला कोणती घाणेरडी सवय असावी, हे तात्काळ माझ्या लक्षात आलं; पण त्याच्या अंगावर उंची कपडे होते. शर्टाला खऱ्या सोन्याची बटनं लावलेली दिसत होती.

त्याचा ' शोध ' चालू होता आणि आम्ही निरखत होतो. तो एकसारखा घाम पुसत होता. एखादा पोरगा जवळून गेला की किळसवाणं हसून तो कुत्र्यासारखा लाळघोटेपणा करत होता मी अशी विकृत माणसं यापूर्वी पाहिली होती.

नंतर त्याचं लक्ष जेनकडे वळलं. त्याबरोबर त्याच्या कपाळावरून घामाच्या धारा वाढल्या; जणु डोक्यात एखादी भट्टी पेटली असावी. अर्थात त्याला दोष देण्यात काहीच अर्थ नव्हता. जेन आज भलतीच आकर्षक दिसत होती. तंग लाल ब्लाऊज आणि नितंबांचा उठावदारपणा स्पष्ट कळेल असा पांढरा स्कर्ट तिनं घातला होता. ती मुळातच मोहक होती.

आम्ही चौकापर्यंत चालत गेलो. टोनी सिगारेट पेटवून म्हणाला, ' आपण त्याला गाठू या ! "

मला प्रथम फारसा उत्साह वाटला नाही. मी तसं सांगितलंही.

' तुला झालंय् काय ?' त्यानं प्रश्न केला. ' तो बकरा चांगला माल बाळगून असणार ! तू नीट पाहिलंस का ?'

' मला त्याची नजर आवडली नाही. वखवखलेला कुत्रा !'

' असेल ! तो पाखराच्या शोधात आहे, दुसरं काय ? आपल्या दृष्टीनं बरंच आहे. '

' का कोण जाणे, पण मला नको वाटतंय्.'

टोनी शेवटी त्याचं म्हणणं खरं करणार, हे मला ठाऊक होतं. मी जेनकडे पाहिलं.

' तुला काय वाटतं ?'

' मलाही त्याची नजर आवडली नाही. माझ्या पोटात खड्डाच पडला! ' जेन म्हणाली.

टोनीनं सिगारेटचं थोटुक गटारात फेकून दिलं.

' हे बघ ! रस्ते रिकामे व्हायला लागले आहेत. आपल्याला दुसरा प्राणी भेटणं अवघड आहे. लवकर काम उरकून टाकू आणि मोकळं होऊ. आपलं नशीब उघडेल !'

' टोनी, मला वाटतं–'

' मी नसता धोका कधी पत्करत नाही. त्याला हाताळणं अवघड असतं, तर मी विचारच केला नसता. तुला ठाऊकच आहे. काय ?'

' नाही ना !' मी जेनकडे बघत होतो. *माझा विरोध मावळल्याचं* तिच्या लक्षात आलं. ती थोडीशी घाबरल्यासारखी दिसली. तिचा चेहरा उतरला होता आमच्या टोळीत *ती नव्यानंच सामील झाली असली तरी* मी सांगितल्यावर वाट्टेल ते करायची तिची तयारी असायची. तिचा भकास चेहरा पाहून *मला वाटलं की टोनीला नकार द्यावा;* पण तेवढं धाडस माझ्यात नव्हतं. शिवाय मी शेपूट पायात घातलं असं त्याला वाटायला नको !

' आपल्याला नक्की जमेल ना, टोनी ?'

' अगदी सहज !'

जेनचा श्वासोच्छ्वास जोरात सुरू झाला. तिच्या हातापायांना कंप सुटला. मी तिला विचारलं : ' तुझी हरकत नाही ना, जेन ?'

क्षणभर ती घुटमळली. नंतर मान हलवून ती म्हणाली, ' तू म्हणत असशील तर मी काहीसुद्धा करीन, जेक !'

टोनी हात चोळत म्हणाला, ' छान !' मग ठरलं तर '

' होय, ' मी मान्यता दिली.

' आता असं करायचं. जेन, तू त्याच्या दिशेनं जा आणि त्या डुकराच्या इशाऱ्याला प्रतिसाद दे. नंतर त्याला घेऊन बाजूच्या अंधाऱ्या गल्लीत जा. तुम्ही गल्लीत शिरलात की आम्ही लगेच हजर होतो आणि त्याचा समाचार घेतो काम अगदी सोपं आहे !'

माझ्याही हातांना कंप सुटला. जेनशी *मैत्री झाल्यापासून मला एवढ्यातेवढ्याची* भीती वाटत असे. मी बळंच हसलो. यापूर्वी अनेक वेळा आम्ही असल्या कामगिऱ्या फत्ते *केल्या होत्या. अजून तरी काहीच घोटाळा* झाला नव्हता.

' ओ. के.' जेन हलक्या आवाजात *म्हणाली, ' पण तुम्ही माझ्या मागोमाग* राहाल, अशी खात्री द्या. मला त्याची धडकी बसली आहे. '

' *काळजी करू नकोस, बेटा !* ' मी वचन दिलं अर्थात मनापासूनच. तिनं टोनीसमोर माझं चुंबन घेतलं. फारच गोड !

ती जाताना मी बघत होतो. माझ्या छातीत कालवाकालव झाली. त्या जाड्या इसमानं मलाही घाबरवलं होतं.

रस्ते रिकामे झाले होते. फक्त जेन आणि तो इसम दिसत होते. त्यानं तिला त्याच्याकडे जाताना पाहिलं. पुन्हा घामाच्या धारा. तो वेड्यासारखा तिच्याकडे बघत होता. मी आणि टोनी त्याला दिसत नव्हतो. तिनं *त्याच्याशी ' बोलणं ' केलं. ती सोळा वर्षांची,* असूनही तशी तयार होती

नंतर जाड्यानं तिच्या ब्लाऊजमधून एक *बोट आत घातलं आणि तो पुढे झुकला.*

माझा इकडे भडका उडाला.

'हो, हो मित्रा !' टोनी कुजबुजला. कारण मी मोठ्यानं शिव्या घातल्या होत्या.

हरामखोरानं जेनच्या कमरेभोवती हात ठेवला आणि ते दोघे पलीकडच्या रस्त्याकडे आमच्यापासून दूर जाऊ लागले. तिच्या चालण्यावरून मात्र समजलं की ती गर्भगळित झाली होती.

'चल जाऊ या, टोनी!' मी चालू लागलो.

माझा दंड पकडून त्यानं मला ओढलं. 'मूर्खा, इतक्यात नाही. तुला आज काय झालंय् ? सगळ्यावर पाणी पाडायचं आहे का ? त्याला संशय येईल !'

त्याचं म्हणणं बरोबर होतं. थोडा वेळ थांबायला हवं होतं. मी पिसाटासारखा धूम्रपान करू लागलो. भयानक अस्वस्थता आली

ते दोघंही दिसेनासे झाले.

'आता जाऊ चल !' टोनी म्हणाला. त्याचे शब्द संपायच्या आतच मी वेगानं जाऊ लागलो. खरं म्हणजे पळायलाच हवं होतं. मी थंडगार पडलो होतो. ती गल्ली शंभर मैल लांब वाटत होती. तिथं कधीच पोचणार नाही असं वाटत होतं.

'सावकाश चाल !' टोनी ओरडला, 'सावकाश !'

त्याला सांगणं सोपं होतं. त्याची पोरगी गल्लीत अडकलेली नव्हती. वेळ भराभर उडत होता. मला तिथे उशीरा पोहचायचं नव्हतं.

पुढच्या क्षणी आमच्या मागून एक पोलिस व्हॅन वेगानं आली. ती थांबली आणि त्यातून दोन 'बैल' खाली उतरले.

'तुम्ही दोघंही थांबा !' एकजण गुरगुरला.

'काय झालं, हवालदारसाहेब ?' टोनीनं विचारलं.

'लवकरच समजेल भिंतीपाशी व्हा !'

'साहेब, आम्ही....' मी प्रयत्न केला.

'ऐकू आलं नाही का ?चला !'

आम्ही दोघं निमूटपणे भिंतीपाशी गेलो. इलाजच नव्हता. एकानं माझी तपासणी केली. माझ्याजवळ काहीच नव्हतं.

'तुम्ही कुठून येताय् ?' त्याला उत्सुकता होती.

'सिनेमाहून आत्ताच बाहेर पडलो.'

'असं ?'

'हो, साहेब ! सिनेमा बघणं हा गुन्हा नाही ना ?'

दुसरा बैल म्हणाला, 'आपण यांना उचलायचं का ?'

अचानक माझं डोकं गरगरू लागलं. चक्कर येऊन मी खाली पडणार, असं मला वाटलं म्हणून मी भिंतीचा आधार घेतला. तसा मी खंबीर आहे. पोलिस मला आवडत नाहीत. यापूर्वी मी तसं दाखवूनही दिलं आहे; पण आज ते शक्य नव्हतं. तिकडे गल्लीत काय चाललं असेल, याचा मी विचार करत होतो. पोलिसस्टेशन एक मैल दूर होतं म्हणून मी बचावाची भूमिका घेतली.

'साहेब, शपथ घेऊन सांगतो–आम्ही खरोखर सिनेमा पाहून येतोय् !'

गुरगुरणारा बैल विचारात पडला. तो दुसऱ्याला म्हणाला, 'त्याला घेऊन थिएटरमध्ये जा आणि त्याला कोणी ओळखतंय का ते बघ !'

टोनीसह दुसरा बैल गेला. मला किंचाळावंसं वाटू लागलं.

माझ्याजवळच्या पोलिसानं बिडी पेटवली. त्याला कसलीच घाई नव्हती. डोळे बारीक करून त्यानं माझ्याकडे पाहिलं.

'तुझी चलबिचल का चाललीय् ? काही गडबड आहे का ?' त्यानं विचारलं.

मी बळंच हसलो. 'छे ! कुठे काय ?का?

'मला आपलं वाटलं.'

मी अस्वस्थपणे पुन्हा हसलो. अद्याप काही बिघडलं नसेल, अशी मी आशा केली; पण गल्लीत लवकर पोचलं पाहिजे. मी त्या दिशेला नजर टाकली. काहीच दिसत नव्हतं. फक्त शुकशुकाट. मी बैलाकडे पाहिलं.

'तुम्ही कुणाच्या शोधात होता, साहेब ?' मी प्रश्न केला.

'एक दुकान दोन भामट्यांनी फोडलं आहे.'

'ते आम्ही नाही काही !' मी तात्काळ बोललो.

'आम्ही ते शोधून काढूच म्हणा.'

मी पुन्हा गल्लीकडे पाहिलं. मला घाम फुटला होता. विटांच्या भिंतीमध्ये मी हाताची बोटं जीव खाऊन दाबली. शेवटी ती दुखू लागली.

जाडधा इसम गल्लीच्या बाहेर आला. क्षणभर त्यानं वळून पाहिलं; जणु मागं काही विसरलं असावं. त्याच्या हातामधून काही तरी रस्त्यावर पडताना मी पाहिलं. नंतर त्याचं माझ्याकडे आणि पोलिसाकडे लक्ष गेलं. आमच्या विरुद्ध दिशेला तो वेगानं दिसेनासा झाला.

माझी जीभ कोरडी पडली. बोलायचं होतं; पण शब्दच फुटेना. टोनी दुसऱ्या पोलिसाबरोबर परत आलेलाही मला आधी दिसला नाही.

'तिकिटविक्री करणाऱ्या मुलीनं याला तिकिट देताना बघितल्याचं सांगितलं.' दुसरा पोलिस म्हणाला.


'ठीक आहे. पोरांनो, लवकर घरी पळा!' आम्हाला सांगण्यात आलं.

मी ऐकलंच नाही; सरळ चालू लागलो. मागोमाग टोनी धावला. दोन्ही बल गाडीत बसून निघून गेले. मी पळत सुटलो. हलकट बैल साले !

आम्ही गल्लीच्या टोकाशी पोचलो. टोनी खाली वाकला अन् त्यानं काही तरी उचललं. जाडया बकऱ्यानं तेच खाली टाकलं असावं. टोनीनं ते उजेडात धरलं. तो मोठा चाकू होता. त्याच्या पात्याला रक्त माखलेलं होतं ! टोनी माझ्याकडे पाहू लागला. आम्ही दोघही सुसाट वेगानं धावत सुटलो माझं त्राणच गेलं होतं. ओकारी होणार, असं मला वाटू लागलं.

आम्हाला तिथं काय आढळणार, ते मला कळून चुकलं होतं ! □

(मूळ लेखक : एडवर्ड पेरी)



# मा णू स

## येत्या १६ ऑगस्ट अंकात

- २२ जून चित्रपट आणि चाफेकर प्रकरण. –सतीश कामत यांचा विशेष लेख.
- विजय परूळकर यांचा ' खैबरनामा '. लेखांक दुसरा.
- विनय सहस्रबुद्धे यांनी घेतलेला अंतुले सरकारच्या गेल्या विधानसभा अधिवेशनातील निराशाजनक कामगिरीचा आढावा.
- शिवाय नेहमीचे विविध साहित्य.
- किंमत : एक रुपया.
- दर गुरुवारी विक्रेत्यांकडे उपलब्ध.

## मराठी लेखकांना एक अपूर्व संधी

### कादंबरी लिहून पारितोषिक मिळवा व शिवाय लेखनमोबदलाही मिळवा.

मराठी कादंबरीचे क्षेत्र जास्त विस्तृत व्हावे आणि ती परकीय भाषांतील कादंबऱ्यांनाही मागे टाकील अशी वैभवसंपन्न व्हावी या हेतूने श्रीविद्या प्रकाशन नव्या स्वतंत्र कादंबऱ्यांसाठी खालील पारितोषिक योजना जाहीर करीत आहे.

या स्पर्धेचे नियम स्थूलमानाने येणेप्रमाणे–

(१) कोणत्याही लेखकास या स्पर्धेत भाग घेता येईल.

(२) कादंबरी स्वतंत्र कलाकृती असावी व ती साधारणपणे डेमी आकाराची छापील दोनशे पृष्ठे होतील येवढी व्हावी.

(३) स्पर्धेच्या निकालासाठी तज्ज्ञ सदस्यांचे मंडळ नियुक्त करण्यात येईल. दिलेला निकाल सर्वांना बंधनकारक असेल.

(४) पारितोषिके पहिल्या तीन क्रमांकांना देण्यात येतील.

  (१) प्रथम पारितोषिक : रु. २०००।–
  (२) द्वितीय पारितोषिक : रु. १२००।–
  (३) तृतीय पारितोषिक : रु. ७५०।–

(५) पारितोषिक प्राप्त कादंबऱ्या प्रकाशित करण्याचा अग्रहक्क श्रीविद्या प्रकाशनकडे राहील. स्पर्धेतील प्रकाशित कादंबऱ्यांना पारितोषिकाव्यतिरिक्त लेखनमोबदला मिळेल.

(६) पारितोषिक प्राप्त न ठरलेल्या काही कादंबऱ्या परंतु पहिल्या दहा क्रमांकात आलेल्या कादंबऱ्या योग्य वाटल्यास लेखनमोबदला देऊन प्रकाशित करण्यात येतील.

(७) नापसंत कादंबऱ्या लेखकांकडे साभार परत पाठविल्या जातील.

(८) कादंबरीचे हस्तलिखित स्वीकारण्याची शेवटची तारीख ३० ऑक्टोबर १९८० ही आहे व निकालाची तारीख साधारणपणे १५ डिसेंबर १९८० ही आहे.

श्रीविद्या प्रकाशनाच्या या आवाहनास मराठी लेखक योग्य तो प्रतिसाद देतील अशी खात्री वाटते.


प्रकाशक : श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे ३०.



“कठीण आणि खरखरीत टूथ पावडरी तुमच्या हिरड्या नि दातांना इजा करू शकतात...”

## कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — श्वास दुर्गंधीही थांबवा!




कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हळुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MB

# सुशिक्षित बेकाम



आपल्यां देशापुढील
एक प्रचंड प्रश्न

देशातील कल्पक आणि जिद्दी तरुणांना
महाबँक व्यवसाय मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य करते.
अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या
आमच्या शाखेस आजच भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी: लोकमंगल १५०१ शिवाजीनगर पुणे - ४११ ००५

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा.

NAWADKAR.

SKY/F/8004